रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १०१
www.ramprahar.com

रविवार, २७ ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

उरणमध्ये उद्या, परवा दाखल होणार अर्ज/२

'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४

टीम इंडियाची अखेर घरच्या मैदानावर हार/८

## बँक घोटाळाप्रकरणी रामकृष्ण बांगर यांना अटक



**बीड :** जिल्ह्यातील पाटोदा येथील महात्मा फुले बँकेच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांच्या घोटाळा प्रकरणातील आरोपी रामकृष्ण बांगर यांना वाशिम येथून अटक करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या विशेष पथकाने ही कारवाई केली. ऐन विधानसभा निवडणुकीदरम्यान बांगर यांना ही अटक करण्यात आली आहे. बांगर यांनी शैक्षणिक संस्था, दूध डेरी, महात्मा फुले अर्बन बँक यासारख्या संस्था स्थापन करून राजकारणातदेखील आपली छाप उमटवली होती, मात्र राजकीय हितसंबंधाचा वापर करून सहकारी संस्थांमध्ये कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केला. बीड जिल्ह्यात महात्मा फुले अर्बन बँकेच्या माध्यमातून १४ कोटी रुपयांच्या घोटाळ्यांचा गुन्हा त्यांच्यासह ४१ जणांवर दाखल झाला होता. गेल्या ३० ते ४० वर्षापासून अनभिषिक्त सम्राट बनलेल्या बांगर यांचे कुटुंब फरार झाले होते.

# भाजपची दुसरी यादी जाहीर

## ■ २२ उमेदवार; आमदार रविशेठ पाटील यांचा समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**




विधानसभा निवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवारांची दुसरी यादी शनिवारी (दि. २६) जाहीर करण्यात आली. या यादीत पेणचे ज्येष्ठ नेते व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांच्यासह एकूण २२ उमेदवारांचा समावेश आहे. यापूर्वी पक्षाने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत ९९ उमेदवारांचा समावेश होता. दोन्ही याद्या मिळून भाजपने आतापर्यंत १२१ उमेदवार जाहीर केले आहेत.

भाजपच्या दुसऱ्या यादीत राम भदाणे (धुळे ग्रामीण), चैनसुख संचेती (मलकापूर), प्रकाश भारसाकळे (अकोट), विजय अग्रवाल (अकोला पश्चिम), श्याम खोडे (वाशिम), केवलराम काळे (मेळघाट), मिलिंद नरोटे (गडचिरोली), देवराम भोंगळे (राजुरा), कृष्णलाल सहारे (ब्रह्मपुरी), करण संजय देवतळे (वरोरा), देवयानी फरांदे (नाशिक मध्य), हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), कुमार ऐलानी (उल्हासनगर), रविशेठ पाटील (पेण), भीमराव तपकीर (खडकवासला), सुनील कांबळे (पुणे छावणी), हेमंत रासणे (कसबा पेठ), रमेश कराड (लातूर ग्रामीण), देवेंद्र कोठे (सोलापूर शहर मध्य), समाधान औताडे (पंढरपूर), सत्यजीत देशमुख (शिराळा) आणि गोपीचंद पडळकर (जत) यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

दरम्यान, यावर प्रतिक्रिया देत म्हटले की, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षाच्या वतीने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील महायुती सरकारच्या विविध योजना व विकासकामांच्या सहाय्याने या सर्व उमेदवारांना विजय मिळण्यास मदत होईल हा मला विश्वास आहे. सर्व उमेदवारांचे मनःपूर्वक अभिनंदन व विजयासाठी हार्दिक शुभेच्छा!

## काँग्रेस, पवार गटाचेही आणखी उमेदवार घोषित

**मुंबई :** काँग्रेस आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी विधानसभा निवडणुकीसाठी दुसरी उमेदवार यादी जाहीर केली. काँग्रेसने दुसऱ्या यादीत २३, तर पवार गटाने २२ उमेदवार घोषित केले आहेत.

काँग्रेसने यापूर्वी पहिल्या यादीतून ४८ उमेदवार जाहीर केले होते. त्यानंतर शनिवारी २३ उमेदवारांची दुसरी उमेदवार यादी जाहीर करण्यात आली. त्यामुळे काँग्रेसचे आतापर्यंत ७१ उमेदवार निश्चित झाले आहेत. त्याचप्रमाणे पवार गटाने यापूर्वी ४५ उमेदवार जाहीर केले होते. त्यानंतर दुसऱ्या यादीत २२ उमेदवार असून आतापर्यंत त्यांचे एकूण ६७ उमेदवारांची नावे समोर आली आहेत.

## 'उबाठा'चे नवे तीन उमेदवार; मुंबईला प्राधान्य

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून तीन उमेदवारांची तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. हे तीनही उमेदवार मुंबईतील आहेत. यासह ठाकरेंचे राज्यात एकूण ८० जागांवर उमेदवार निश्चित झाले आहेत.

महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसने आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने दुसरी यादी जाहीर केल्यानंतर 'उबाठा'कडून वर्सोवा, घाटकोपर पश्चिम आणि विलेपार्ले येथील उमेदवारांची नावे घोषित करण्यात आली, तर मलबार हिल या जागेवरून महाविकास आघाडीत अंतिम निर्णय झाला नसताना ठाकरे गटाकडून भैरू चौधरी यांना एबी फॉर्म देण्यात आला आहे.

**मनसेची पाचवी यादी** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पाचवी उमेदवार यादी घोषित झाली असून त्यात कोल्हापूर, बीड, नागपूर, रायगड, सोलापूर जिल्ह्यातील मिळून १५ जागांचा समावेश आहे. त्यामुळे आतापर्यंत मनसेचे एकूण ७८ उमेदवार ठरले आहेत.

### आतापर्यंत जाहीर झालेले प्रमुख पक्षांचे उमेदवार

| महायुती | महाविकास आघाडी |
|---|---|
| भाजप १२१ | काँग्रेस ७१ |
| शिवसेना ४५ | पवार गट ६७ |
| राष्ट्रवादी ४५ | ठाकरे गट ८० |

# नैना प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : नितीन देशमुख**




शेतकऱ्यांवर अन्याय करून नैना प्रकल्प होऊ देणार नाही, या भूमिकेचा पुनरूच्चार आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. २६) परिवर्तन गावठाण विकास सामाजिक संस्थेने आयोजित केलेल्या विचार मंच कार्यक्रमात केला. या वैचारिक कार्यक्रमात शेकाप कार्यकर्त्यांनी गोंधळ घालण्याचा केविलवाणा प्रयत्न केला.

परिवर्तन गावठाण विकास सामाजिक संस्थेचा तिसरा वर्धापन दिन पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात साजरा करण्यात आला. त्याचे औचित्य साधून नैना क्षेत्रातील गावांचे सीमांकन करून गावठाण विस्तार व नैना टीपी स्कीम याबाबत ॲड. प्रल्हाद कचरे व ॲड. के.टी. खांडेकर यांच्याबरोबर संवाद साधण्याचा विचार मंच कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या वेळी नैना प्रकल्पाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, शेतकऱ्यांवर अन्याय होऊन हा प्रकल्प होऊ देणार नाही. टीआयपीएलला जरी कामाचा ठेका मिळाला असला तरी मी तुम्हाला आश्वस्त करतो की शेतकऱ्यांचे समाधान होत नाही तोपर्यंत कोणाही ठेकेदारला इथे एकही वीट लावू देणार नाही, असे स्पष्ट केले. तुमचे समाधान होईपर्यंत आम्ही रस्त्यावर तुमच्यासोबत थांबू. नैनाच्या माध्यमातून ज्या गोष्टी आपल्याला नको आहेत त्या गोष्टी नसल्या तर नैना हवी की नैनाच नको, ग्रामस्थांना हा प्रकल्प हवा की नको याबाबत त्या गावात ग्रामसभा घेऊन तसा निर्णय घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी आपण पत्र दिलेले आहे. आपण कोणाची घरे पाडण्यासाठी हे पत्र दिले नसल्याचेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

शेतकऱ्यांचे पूर्ण समाधान झाले पाहिजे यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रत्येक गावाची सर्वपक्षीय कमिटी बनवा. आम्ही सगळे तुमच्याबरोबर असू. सिडकोच्या अधिकाऱ्यांना एक पाऊल टाकू न देण्याची काळजी आपण घेऊ, कारण ही आपली जमीन आहे. आमच्या जागेत सिडको असे नियोजन करू शकत नाही हे सर्वांनी एकमुखाने म्हटले पाहिजे, असे नमूद करून गावांचे सीमांकन करून गावठाण विस्तार करण्याबाबत किरण पाटील यांनी चळवळ उभी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

या वेळी माजी आमदार बाळाराम पाटील यांनी नैना प्रकल्पाला विरोध करताना आपल्या भाषणात आपण वेळोवेळी विधिमंडळात आवाज उठवला, पण या सरकारने काहीच केले नाही. निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचे सरकार येईल ते याबाबत निर्णय घेईल, असे सांगितले होते. त्याचा समाचार घेताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी २०१९मध्ये महाविकास आघाडीचे सरकार होते. या सरकारने कोणताच निर्णय घेतला नाही हे निदर्शनास आणून दिले.

संस्थेचे अध्यक्ष किरण पाटील प्रस्ताव मांडत असताना शेकापच्या कार्यकर्त्यांनी विरोध सुरू केल्याने गोंधळ झाला. त्याला भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांनी प्रत्युत्तर दिले. त्यानंतर अध्यक्ष ॲड. प्रल्हाद कचरे यांचे भाषण झाल्यावर प्रश्न विचारण्यासाठी माईक पाहिजे म्हणून पुन्हा गोंधळ झाला. या वेळी पोलिसांनी सभागृहात येऊन गोंधळ थांबवला. शेकापच्या गोंधळामुळे ॲड. के.टी. खांडेकर यांना आपले भाषण दोन मिनिटांत संपवावे लागले.

या कार्यक्रमास भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, प्रकल्पग्रस्तांचे नेते राजाराम पाटील, वामन शेळके, किसन नेरूळकर यांच्यासह पदाधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

## निवडक

### सिद्दीकी हत्याकांडातील शुर्टस होते अनमोल बिश्नोईच्या संपर्कात

**मुंबई :** राष्ट्रवादीचे नेते व माजी मंत्री बाबा सिद्दीकी हत्याकांडात तपास करणाऱ्या मुंबई गुन्हे शाखेने नवा खुलासा केला आहे. या गोळीबारातील तीन आरोपी गुरमैल सिंह, धर्मेंद्र कश्यप आणि शिवकुमार हे लॉरेन्स बिश्नोईचा छोटा भाऊ अनमोल बिश्नोईच्या सातत्याने संपर्कात होते. ते स्नॅपचॅटच्या माध्यमातून संवाद साधायचे. पोलिसांनी या प्रकरणी आतापर्यंत १० आरोपींना अटक केली आहे. या कटात सहभागी असणाऱ्यांकडून चार फोन जप्त केले आहेत. या फोनच्या पडताळणीत हत्येच्या आधी आरोपी अनमोलच्या संपर्कात असल्याचे पुढे आले आहे.

### गर्भवती प्रेयसीचा खून करून मृतदेह पुरला

**नवी दिल्ली :** येथील नांगलोई भागात राहणाऱ्या सोनी नावाच्या १९ वर्षीय तरुणीचा प्रियकराकडून निर्घृण खून करण्यात आला आहे. सोनी सात महिन्यांची गर्भवती होती. तिने प्रियकर संजू ऊर्फ सलीमकडे लग्नाचा तगादा लावला. त्यामुळे सलीमने त्याच्या दोन मित्रांच्या मदतीने हरियाणाच्या रोहतक येथे सोनीचा खून केला आणि नंतर तिला एका शेतात पुरले. पोलिसांनी संजू ऊर्फ सलीम आणि त्याचा मित्र पंकजला अटक केली आहे.

## महायुतीचे उमेदवार व कार्यसम्राट आमदार

# प्रशांत ठाकूर उद्या दाखल करणार अर्ज



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघातून भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय व मित्रपक्ष युतीचे उमेदवार व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर हे सोमवारी (दि. २८) आपला अर्ज निवडणूक अधिकारी यांच्याकडे दाखल करणार आहेत.

सलग तीनवेळा बहुमताने विजय मिळवत विरोधकांना धोबीपछाड देणारे कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर हे मताधिक्य मिळवून विजयाचा चौकार मारण्यासाठी ज्येष्ठ, युवा, महिला, कार्यकर्ते व मतदारराजाच्या आशीर्वादाने सज्ज झाले आहेत. सोमवारी सकाळी ९ वाजता पनवेल येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयात पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतक जमणार असून त्यानंतर महायुतीतील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रॅलीद्वारे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्त्व देणारे आणि जनतेने टाकलेला विश्वास सार्थ करणारे लोकप्रतिनिधी म्हणून लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे पाहिले जाते. पनवेल मतदारसंघाचे सक्षम लोकप्रतिनिधी म्हणून संपूर्ण जबाबदारीने ते कार्यरत आहेत. प्रगतीपासून दूर आणि भकास झालेल्या पनवेलला विकासाचा चेहरा देण्याचे काम त्यांनी केले व खऱ्या अर्थाने विधायक कार्याने पनवेलला नवी ओळख करून दिली. सर्वधर्मसमभाव आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम त्यांच्याकडून कायम पहायला मिळते. त्यामुळे पुन्हा एकदा त्यांना जनतेचा कौल मिळणार असून सोमवारी ते तमाम जनतेच्या साक्षीने उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

## किल्ले रायगडावर बुडून एकाचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावरील गंगासागर तलावात बुडून एका पर्यटकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याबाबत महाड तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

महाड तालुका पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार किल्ले रायगडावर गंगासागर तलावात एका व्यक्तीचा मृतदेह आढळला. याबाबत प्रवीण हरिश्चंद्र तांबोळी (रा. पेण) यांनी पोलिसांना माहिती दिली. त्यानुसार मयत व्यक्तीला बाहेर काढल्यानंतर खिशात सापडलेल्या ओळखपत्रानुसार त्याचे नाव रमेश दत्तू आंब्राळे (रा. आभ्रळ, महाबळेश्वर) आहे. त्याला एकटेपणाची आवड होती तसेच तो थोडा मंद होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. याबाबत अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र कुमार सानप यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार वी.वी. महाडिक करत आहेत.




# उरणमध्ये शेकापला धक्का!

## मेघनाथ तांडेल यांचा भाजपमध्ये प्रवेश

**उरण : रामप्रहर वृत्त**



विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत उरण मतदारसंघात शेकापला खिंडार पडले आहे. शेकापचे उरण तालुका चिटणीस मेघनाथ तांडेल यांनी पक्षाला राम राम करत भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षात स्वागत केले.

आमदार महेश बालदी यांच्या दूरदृष्टीतून होणाऱ्या विकासकामांवर आणि सक्षम नेतृत्वावर आकर्षित होऊन शेकापचे मेघनाथ तांडेल यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशाने उरणमध्ये शेकापला जबर धक्का बसला आहे, तर भाजप अधिक मजबूत झालाय. या वेळी आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, माजी सरपंच योगेश पाटील, भार्गव पाटील, राकेश म्हात्रे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# 'भाजप आणि युवा मोर्चा तरुणांसोबत'



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तरुणवर्गाला असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पक्ष आणि युवा मोर्चा तुमच्यासोबत आहे, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामोठे येथे दिली.

पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कुशल नेतृत्वाखाली अनेक विकासाची कामे वेगाने सुरू आहेत. त्यांच्या या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून युवा नेते प्रवीण माने व रोहन पवार यांनी समर्थकांसह शुक्रवारी (दि. २५) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या तरुणांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले. त्या वेळी ते बोलत होते.

तुमच्या प्रवेशाने कामोठ्यातील भाजप अधिक मजबूत होईल. येणाऱ्या काळात या परिसरात लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे येथील एकही तरुण बेरोजगार राहणार नाही, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

या कार्यक्रमास भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, गोपीनाथ भगत, युवा नेते हॅप्पी सिंग, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, भाजप कामोठे सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, अनिल केंद्रे, युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# क्रांतिकारी शेतकरी संघटना महाविकास आघाडीतून बाहेर



**बुलडाणा : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. रविकांत तुपकर यांच्या क्रांतिकारी शेतकरी संघटनेने वेगळी वाट निवडली आहे. महाविकास आघाडीने चर्चा करून खेळवले आणि नंतर दगाफटका केला. त्यामुळे महाविकास आघाडीबरोबर क्रांतिकारी शेतकरी संघटना जाणार नाही, असे तुपकर यांनी स्पष्ट केले आहे.

बुलढाण्यासह आसपासच्या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांमध्ये क्रांतिकारी शेतकरी संघटना संघटना लोकप्रिय आहे. रविकांत तुपकर यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची व इतर शेतकरी नेत्यांची बैठक शनिवारी (दि. २६) बोलवली होती. या बैठकीत त्यांनी विधानसभा निवडणूक लढण्याबाबत चर्चा केली.

महाविकास आघाडीने शेतकऱ्यांचा अपमान केला आहे. कदाचित त्यांना शेतकऱ्यांच्या मतांची गरज नसावी. महाराष्ट्रात क्रांतिकारी शेतकरी संघटना ताकदीने उभी राहील. या राज्यात काही ठिकाणी शेतकरी पुत्र अपक्ष लढणार आहेत, आम्ही त्यांचा प्रचार करणार आहोत, असे सांगून निवडणूक लढवायची की नाही याबाबतचा निर्णय २९ ऑक्टोबर रोजी घेऊ, असे तुपकर म्हणाले.

## निवडणूक प्रचार खर्चाची नियमावली जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. अशा स्थितीत निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या प्रचार खर्चासाठी; त्याबरोबरच उमेदवार निवडणुकीत किती पैसे खर्च करू शकतो याची नियमावली जाहीर केली आहे.

निवडणूक आयोगाकडून प्रचार खर्चाचे दरपत्रक जाहीर केले आहे. निवडणूक प्रचारात वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक छोट्या-छोट्या गोष्टींचे दर निश्चित करण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाने या वेळी उमेदवाराला ४० लाखांपर्यंत खर्च करण्याची उभा दिली आहे. मागच्या विधानसभेत ही मर्यादा २८ लाख होती. निवडणूक प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर या खर्चाचा लेखाजोखा आयोगाला सादर करावा लागणार आहे.

# उद्धव ठाकरे गटाला मुंबईत धक्का

## * दोन नेते पक्ष सोडणार, अपक्ष लढण्याची तयारी

**मुंबई : प्रतिनिधी**



विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर उद्धव ठाकरे गटाला मुंबईत धक्का बसणार आहे. वर्सोवा विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीत कुणाच्या वाट्याला जाणार अशी चर्चा सुरू होती. अखेर हा मतदारसंघ ठाकरे गटाला सोडण्यात आला, परंतु तिथे अनपेक्षितपणे ठाकरे गटाने हरुन खान यांना उमेदवारी दिली त्यामुळे येथील इच्छुक राजू पेडणेकर आणि राजूल पटेल नाराज झाले आहेत. पक्षाने अन्याय केला, अशी खंत व्यक्त करत हे दोघेही अपक्ष निवडणूक लढण्याची तयारी करत आहेत.

याबाबत लोकमत ऑनलाईनशी राजूल पटेल यांनी संवाद साधला. त्यावेळी त्या म्हणाल्या की, वर्सोव्यातून हरुन खान यांना उमेदवारी दिल्याने मी नाराज आहे. तिकिट देताना काय निकष पाहिले माहिती नाही. मला जेव्हा शिवसेना–भाजपा ऑफर देत होते तेव्हा मी पक्षासोबत एकनिष्ठ राहिले. वेळ पडल्यास मी अपक्ष निवडणुकीत उभं राहणार आहे. मागील निवडणुकीत अपक्ष निवडणूक लढवून मी ३२८०० मते घेतली होती. जे आमदार झाले त्यांना ३६ हजार आणि मला ३२ हजार मतदान झाले होते. मी दुसऱ्या क्रमांकावर होते. युतीत ही जागा भाजपाला गेली होती म्हणून मी अपक्ष निवडणूक लढले होते असं त्यांनी सांगितले. तसेच २०१४ साली माझा अर्ज बाद झाला होता, त्यामुळे गेल्या निवडणुकीत मी अपक्ष निवडणूक लढवून पक्षाचे नुकसान भरून देईन असे वाटले होते, परंतु यावेळी संधी मिळेल अशी अपेक्षा होती असेही राजूल पटेल यांनी खंत व्यक्त केली.

तर ३५ वर्षांची अहोरात्र मेहनत, त्याग, पक्षनिष्ठा, संघटने प्रति समर्पण, केसेस, समाजकार्य या बदल्यात सततचा होणारा अन्याय! २००४,२००९,२०१४,२०१९! आता २०२४ ला या सर्वाचा न्याय निवाडा माझ्या वर्सोवा विधानसभेतील माझ्या जिवाभावाचे शिवसैनिक, कार्यकर्ते, व सर्व सामान्य जनता नक्कीच करेल ही त्यांच्याकडून अपेक्षा. मी या अन्याय विरुद्ध लढत आहे. तीन दशकाच्या माझ्या राजकीय सामाजिक जीवनाच्या प्रवासात कधीतरी हा छोटासा कार्यकर्ता तुमचा राजू तुम्हाला उपयोगी पडला असेल तर मला नक्की बळ द्या! अन्यायाविरुद्धच्या या लढाईत सामील व्हा,आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा असं आवाहन वर्सोवा विधानसभा मतदारसंघातील ठाकरे गटाचे दुसरे इच्छुक राजू पेडणेकर यांनी जनतेला केले आहे. त्यामुळे राजू पेडणेकर हेदेखील या निवडणुकीत अपक्ष उतरण्याची तयारी करत आहेत.

राजू पेडणेकर हे मुंबई महापालिकेत तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आलेत तर राजूल पटेल यादेखील शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्या आहेत. शिवसेना महिला विभाग संघटक आणि नगरसेविका म्हणून त्यांनी काम केले आहे. विशेष म्हणजे राजूल पटेल यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर जोपर्यंत शिवसेनेचा मुख्यमंत्री महाराष्ट्रात होत नाही तोपर्यंत पायात चप्पल न घालण्याची भीष्मप्रतिज्ञा केली होती. २०१२ ते २०१९ पर्यंत त्यांनी सात वर्ष अनवाणी फिरत पक्षाचा प्रचार केला होता. २०१९ च्या निवडणुकीत अपक्ष म्हणून राजूल पटेल यांनी ३२ हजार मते घेतली होती. त्यांना या वेळी वर्सोव्यातून तिकिट मिळेल अशी अपेक्षा होती, परंतु पक्षाने तिकिट न दिल्याने त्या नाराज झाल्या आहेत.

# उरणमध्ये सोमवार, मंगळवारी दाखल होणार नामनिर्देशन अर्ज

**उरण : वार्ताहर**

उरण विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पक्ष भाजपा, शिवसेना (ठाकरे) व शेतकरी कामगार पक्ष यांच्या उमेदवारांकडून सोमवार व मंगळवारी नामनिर्देशन अर्ज दाखल करणार आहेत. या वेळी शक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे. यासाठी वाहतूक विभागाने तयारी केली आहे. या वेळी वाहतुकीच्या मार्गात कोणत्याही प्रकारचे बदल करण्यात आलेले नाहीत.

सोमवारी शिवसेना ठाकरे गटाचे नेते माजी आमदार मनोहर भोईर हे आपला अर्ज दाखल करणार आहेत. तर मंगळवारी विद्यमान आमदार महेश बालदी व शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रितम म्हात्रे अर्ज दाखल करणार आहेत. या तिन्ही उमेदवारांकडून अर्ज दाखल करतांना शक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे.

उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यालय जासई येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विद्यालयात सुरू करण्यात आले आहे. हे कार्यालय उरण शहरापासून दहा किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या कमी आहे, मात्र तरीही या मार्गावरील वाहतूक सुरळीत रहावी यासाठी वाहनतळ ठरविण्यात आले आहेत.

यात निवडणूक निर्णय कार्यालया लगतच्या रांजणपाडा येथील मैदानात वाहन तळाची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती उरण वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी दिली आहे.


## निवडक

### वावेघरमध्ये गुटखाविक्रेत्यावर कारवाई

**मोहोपाडा :** रसायनीतील वावेघर इंद्रनगर येथे महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या व आरोग्यास अपायकारक असलेला गुटखा विरेंद्र चंचल गुप्ता यांच्या भाजीच्या दूकानात विक्री करीत असताना मिळून आला. यात एकूण ३१६८० रूपये किमतीचा गुटखा कार्यवाहीत जप्त करण्यात आलेला असून यशवंत झेमसे स्थानिक गुन्हे अन्वेशन शाखा, रायगड अलिबाग यांच्यासह रसायनी पोलिसांनी आरोपी विरेंद्र चंचल गुप्ता (वय.३२, रा. इंद्रनगर वावेघर) याच्यावर रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई धोंडे हे पुढील तपास करत आहेत.

### कौस्तुभ भाग्यवंतचे यश

**पनवेल :** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या तबला विशारद परीक्षेत पनवेलचा कौस्तुभ भाग्यवंत



संपूर्ण भारतात दुसरा आला आहे. लहानपणापासूनच तबलावादनाची आवड असलेल्या कौस्तुभने तबलावादनाचा छंद जोपासताना अभ्यासाकडे मात्र अजिबात दुर्लक्ष केले नाही हे त्याचे दहावीतले ९९ टक्के आणि बारावीतले ९८ टक्के गुण दाखवून देतात. कौस्तुभला केंद्र सरकारची शिष्यवृत्ती मिळत असून सध्या तो सीए करीत आहे.

# तानाजी धरणे यांना साहित्य पुरस्कार

**रोहे : प्रतिनिधी**

लेखक तानाजी धरणे लिखित हेलपाटा या बहुचर्चित कादंबरीला अल्पावधीतच १८ राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले. धृपद एन्टरटेनमेंट व महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना यांच्या संयुक्त विद्यमाने तीनशेहून अधिक साहित्यकृतीतून या हेलपाटा कादंबरीची लक्षवेधी पुरस्कारासाठी तज्ञ परीक्षक समितीने निवड केली.

शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह,सन्मानपत्र व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप असून प्रस्तुत कार्यक्रमाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कवी,लेखक, गीतकार प्रविण दवणे होते, प्रमुख पाहुणे लेखिका नीता शरत् कुमार माडगूळकर, अध्यक्ष मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे विद्याधर ठाणेकर, अध्यक्ष मराठी एकीकरण समिती, गोवर्धन देशमुख, संदीप पाचंगे, जनार्दन म्हात्रे, गोडसे मॅडम यांच्या हस्ते हा पुरस्कार लेखक तानाजी धरणे यांना सन्मानपूर्वक सुपूर्द करण्यात आला.

डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे या ठिकाणी साहित्यवलय पुरस्कार –२०२४ ने त्यांना सन्मानित करण्यात आले. धृपद एन्टरटेनमेंटचे सर्वेसर्वा व सुप्रसिद्ध कवी ऋग्वेद देशपांडे व सौ. पूजा ऋग्वेद देशपांडे यांनी या कार्यक्रमाचे सुंदर




व शिस्तबद्ध नियोजन केले. लेखक तानाजी धरणे यांच्या या साहित्यिक वाटचालीबद्दल त्यांचे मित्रमंडळ यांनी व साहित्यिक सचिन बेंडभर, लेखक शेखर फराटे, लेखक कुंडलिक कदम, राहुल चातुर, परदेशी सर, राजेंद्र सात्रस, पिंगळे सर पत्रकार झी मिडिया, बालरोगतज्ञ डॉ . चंद्रशेखर दाभाडकर, ज्येष्ठ कवी सुरेश मेहता सर्व ग्रामपंचायत अधिकारी बंधु व भगिनी यांनी अभिनंदन केले व पुढील साहित्यिक वाटचालीसाठी हार्दीक शुभेच्छा दिल्या.

# मुलीवर अत्याचार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आळी आंबिवली येथे राहणाऱ्या एका भाडोत्री घरात १७ वर्षीय मुलीवर तिच्या वडिलांनी शारिरीक अत्याचार केले. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुळेचा बिहार राज्यातील आरोपी सुरेश मिश्री सिंग (वय ३९ वर्षे) भाड्याने आळी आंबिवली येथील घरात झोपला होता. त्याची मुलगी हॉलमध्ये त्याचा मोबाईल फोन बघत बसली असताना फोन लॉक झाल्याने तिने वडिलांना झोपेतुन उठविले. त्याचा राग आल्याने सुरेश सिंग याने मुलीला जबरदस्तीने शारिरीक संबंध प्रस्थपित केले तसेच सदरचा प्रकार हा फिर्यादीमुळे घडला असा आरोप करून मुलीला शिवीगाळी दमदाटी केली. यासोबतच केबलने मारहाण केली असल्याची तक्रार पिडीत मुलीने रसायनी पोलीस ठाण्यात केले आहे.

याप्रकरणी आरोपी सुरेश मिश्री सिंगविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झालेला असून वरिष्ठ पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार सपोनि श्री जाधव अधिक तपास करत आहेत.

# नवी मुंबईत रंगणार दीपावली हास्य संध्या

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर व येणाऱ्या दीपोत्सवाच्या अनुषंगाने नवी मुंबई प्रेस क्लबच्या वतीनेहास्य कविता आणि रंजक गप्पांद्वारे राजकारणावर मार्मिक व खुसखुशीत भाष्य करणाऱ्या अ–राजकीय हास्य संध्येचे आयोजन मंगळवारी (दि.२९) सायंकाळी ७.३० वाजता वाशीत करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील राजकारणाला आगळा रंग चढू लागला असताना मतदार राजाला कोजागर्ति अर्थात कोण जागे आहे असे विचारून जागे करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे नुकत्याच साजऱ्या झालेल्या कोजागरी पोर्णिमेचे व दीपावलीचे औचित्य साधत नवी मुंबई प्रेस क्लबने या खुर्चीसाठी चाललंय काय? या अ–राजकीय हास्य संध्येचे आयोजन केले आहे.

वाशीतील विष्णूदास भावे नाट्यगृहात होणाऱ्या या हास्य संध्येत ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे, महेश केळूसकर, मिर्झा बेग (अमरावती) यांच्यासह ज्येष्ठ पत्रकार–साहित्यीक श्रीकांत बोजेवार सहभागी होणार आहेत.

### पनवेलमध्ये स्वरदीप उजळणार

**पनवेल :** पनवेल कल्चरल असोसिएशन, सूर निरागस हो.. आणि ज्येष्ठ नागरिक संघ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये दीपावलीच्या पूर्वसंध्येला सायंकालीन दीपोत्सवी मैफलीचे आयोजन रविवारी (दि. २७) सायंकाळी ५.३० वाजता करण्यात आले ाअहे.

सांगली येथील अभिषेक काळे, चिपळूण येथील राजाभाऊ शेंबेकर आणि पुण्यातील निकिता कानिटकर हे गायक कलाकार गाजलेली नाट्यगीते, अभंग आणि भक्तिगीते सादर करतील. त्यांना साथसंगत हर्षल काटदरे, हेरंब जोगळेकर, सूरज गोंधळी, समीर कर्वे देणार आहेत.

कार्यक्रमाचे निवेदन निबंध कानिटकर करणार असून कार्यक्रम रविवारी ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह, पनवेल येथे होत असून तो तिन्ही संस्थांच्या सदस्य आणि कुटुंबियांसाठी विनाशुल्क आहे. अधिक माहितीसाठी मिलिंद गोखले (८८७९९८७३७१), किरण बापट (८४५४८६३३४२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई

## चालकांकडून लाखोंचा दंड वसूल

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक सुरू असल्याने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाहनांची वरदळ होत आहे. यासोबतच दिवाळीनिमित्त नागरिक बाहेर पडत आहेत. या वेळी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी (दि.२५) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २७० वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून दोन लाख ५६ हजार ९०० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# मनसेकडून योगेश चिलेंना उमेदवारी

**मुंबई : प्रतिनिधी**

पनवेलमधून योगेश चिले यांना मनसेकडून उमेदवारी देण्यात आली आहे. मनसेने मनसेची पाचवी उमेदवार यादी जाहीर केली. यात चिलेंचे उमेदवार नाव आहे.

येत्या विधानसभा निवडणुकीत मनसे स्वबळावर निवडणूक लढवत असून आतापर्यंत चार उमेदवार याद्या मनसेने जाहीर केल्यात. शनिवारी (दि.२६) मनसेची पाचवी उमेदवार यादी घोषित झाली असून त्यात कोल्हापूर, बीड, नागपूर, रायगड, सोलापूर जिल्ह्यातील काही जागांचा समावेश आहे. यामध्ये पनवेलमधून योगेश चिले यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# बांधकाम व्यवसाय कार्यालयाचे उद्घाटन

**उरण : बातमीदार, वार्ताहर**



उरण तालुक्यातील मोठी जुई येथील प्रवीण घासे हे उत्तम सामाजिक कार्यकर्ते असून उत्तम बांधकाम व्यावसायिक देखील आहेत. दिवसेंदिवस त्यांची प्रगती उत्तरोत्तर वाढतच आहे. बांधकाम क्षेत्रात खुप कमी वयात खुप उंच भरारी घेणारे प्रवीण घासे यांनी मोठी जुई येथील ग्रामीण भागातून व्यवसायाला सुरवात करून नवी मुंबईत बांधकाम क्षेत्रात नावारूपाला आले. त्यांनी नवी मुंबईत सर्वांच्या सेवेसाठी बेलापूर येथे स्मार्ट सिटी डेव्हलपर्स या नवीन ऑफिस सुरु केले असून नुकताच त्याचे उद्घाटन करण्यात आले.

या उद्घाटनावेळी उद्योजक यशवंत दादा घासे, शेखर तांडेल, शिवसेना पनवेल उपाध्यक्ष विठ्ठल मुंगजी, उरण भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड, भाजप युवा अध्यक्ष निलेश पाटील, रायगड जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पाटील, भाजप पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, विशाल पाटेकर, रायगड भूषण हरेश्वर ठाकूर, उद्योगपती कुलदीप नाईक,देवेंद्र पाटील, समीर फडके, कलाकार सनी फडके, गिरीश म्हात्रे, नितेश भोईर, कुमार पाटील, सरपंच दिपक भोईर, धनेश गावंड, मोठीजुई भाजप गाव अध्यक्ष भरत पाटील, उरण विधान सभा विस्तारक करण ठाकूर, नंदन म्हात्रे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

बांधकाम व्यवसायात चांगली कामगिरी करत असल्याबद्दल व नवीन ऑफिसचे उदघाटन केल्या बद्दल विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांनी प्रवीण घासे यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# वातावरणात बदल

पनवेल : गेले काही दिवस रायगडासह राज्यात पाऊस परतला असून ऑक्टोबर हिट लांबली आहे. यामुळे वातावरणात बदल झाला आहे. ऑक्टोबर हिट उशीरा सुरू झाली असून ऊनाचा तडाखा वाढला आहे. तसेच रात्री थंडीची चाहूल जाणवत आहे. सकाळ, दुपार कडक ऊन व रात्री, पहाटे गार वारा यामुळे वातावरणात बदल जाणवू लागला आहे. अशा वातावरणाचा मानवाच्या शरीरावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. सर्दी, खोकला, घसा खवखवणे अशा अनेक आजारांना आमंत्रण मिळत असल्याने डॉक्टरांनी नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

# दिव्यांग व्यक्ती, विद्यार्थी, पालकांनी बनवलेल्या दिवाळी वस्तूंच्या प्रदर्शनाला उत्तम प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेचे ईटीसी दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्र हे एकाच छताखाली सर्व प्रकारच्या दिव्यांगांना सामावून घेणारे देशातील अग्रगण्य केंद्र म्हणून नावाजले जाते आहे. केंद्रामार्फत दिव्यांग सक्षमीकरणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत असतात.

असाच एक अभिनव उपक्रम दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेला असून या अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांनी ईटीसी केंद्रात तसेच पालकांच्या मदतीने घरी बनविलेल्या दिवाळी सणामध्ये उपयोगी असणाऱ्या वस्तूंचे प्रदर्शन महापालिका मुख्यालयात आणि ईटीसी केंद्रात आयोजित करण्यात आले होते.



महानगरपालिकेच्या ईटीसी केंद्रामध्ये १५ ते १८ वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी पूर्व व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे. हे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव मिळावा व त्यांना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने प्रेरणा मिळावी या करिता प्रशिक्षण व रोजगार ही कार्यप्रणाली प्रभावीपणे राबविली जात आहे.

या अंतर्गत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिव्यांग विद्यार्थ्यांनी केंद्रात तसेच घरी पालकांच्या मदतीने बनविलेल्या दिवाळीत उपयोगी वस्तूंचे प्रदर्शन महापालिका मुख्यालयात आणि ईटीसी केंद्रात उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या पुढाकारातून भरविण्यात आले होते.

या प्रदर्शनाला लाभलेल्या उत्तम प्रतिसादामुळे दिव्यांग विद्यार्थी व व्यक्ती यांच्या आत्मविश्वासात भर पडली असून त्यांना वस्तू विक्रीतून रोजगारही उपलब्ध झालेला आहे.

# लर्निंग ॲण्ड अर्निंग उपक्रमाला प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रमिक शिक्षण मंडळाचे एफ.जी.नाईक महाविद्यालयात महिला विकास कक्ष अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी लार्निंग आणि अर्निंग उपक्रम झाला.

उपक्रमाचा मुख्य उद्देश हा महिला सक्षमीकरण असून शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींना सक्षम करून त्यांना स्वावलंबी बनवणे व अशा विविध उपक्रमाद्वारे त्यांना प्रोत्साहित करून व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होय. या उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांच्या हस्ते करण्यात आले.



या उपक्रमांतर्गत दिवाळी या सण–उत्सवाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल लावून स्वतःची कला सादर केली.ह्या स्टॉलमध्ये दिवाळीचे विविध स्वादिष्ट फराळाचे पदार्थ, ज्वेलरी, मेहेंदी, रांगोळी, स्केचेस, गृह उपयोगी वस्तू यांचा समावेश होता.

प्रास्ताविकपर भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांनी महिला विकास कक्ष अंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देत त्यामागील महाविद्यालयाची भूमिका स्पष्ट केली तसेच जर का विद्यार्थिनींना सक्षम करायचे असेल तर त्यांचा शैक्षणिक, सामाजिक विकास हा खूप महत्त्वपूर्ण आहे व त्यातूनच त्या अर्थजन प्राप्त करून स्वतःचे अस्तित्व निर्माण करून स्वतःच्या स्वप्नांची व ध्येयाची स्वच्छंदी भरारी शकतात हे मत व्यक्त करत, विद्यार्थिनींनी आजच्या उपक्रमामध्ये आपल्या कला कौशल्याने विविध साहित्याचे स्टॉल लावले होते त्याचे कौतुक केले व भविष्यातील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वहस्ते केलेल्या ह्या वस्तू आणि जिन्नस स्वतःचे कौशल्य, सादरीकरण, मार्केटिंग स्किल, स्वादिष्ट चव ह्या विविध निकषांवर विकून दाखवले.

उपक्रमा अंतर्गत प्रथम क्रमांक द्वितीय कला शाखेतील गायत्री म्हात्रे, विनया जाधव तसेच द्वितीय क्रमांक तृतीय कला शाखेतील कीर्ती साळुंखे, ज्योती पाटील व आरती बेले तसेच तृतीय क्रमांक द्वितीय कला शाखेतील दिशा सावंत व आलिषा मेर यांनी पटकावला.

कार्यक्रमाचे आयोजन महिला विकास कक्ष सदस्य प्रा.स्वाती हैलकर, प्रा. चिन्मयी वैद्य तसेच सदर कार्यक्रमाचे परीक्षण प्रा.समिधा पाटील व प्रा.प्राजक्ता सावंत यांनी केले.

## निवडक

### मोहोपाड्यात विदेशी मद्य जप्त

**मोहोपाडा :** गावाच्या हद्दीत दांडफाटा-आपटा रस्त्यावरील पिल्लई कॅम्पसच्या गेटजवळ वॅगनर कारमध्ये विदेशी दारूची वाहतूक करत असताना रसायनी पोलिसांच्या हाती लागली आहे. यात विदेशी दारुचा एकूण ९४८४० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. याबाबत आरोपी विकास सिंग शिवशंकर सिंग (वय ३, सीबीडी बेलापूर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अधिकारी सहाय्यक फौजदार कोळेकर यांनी केली.

### अनुसूचित जाती मोर्चाचा आज मेळावा



**पनवेल :** भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका ग्रामीण व पनवेल शहर मंडल यांच्या वतीने रविवारी (दि.२७) सकाळी ११ वाजता पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात जाहीर मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांना निमंत्रण देण्यात आले. या वेळी जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, अनुसूचित जाती मोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात, तालुका अध्यक्ष अविनाश गायकवाड आदी उपस्थित होते.

### रिक्षा व टॅक्सी संघटनेचा आज मेळावा

**पनवेल :** भाजप पुरस्कृत वंदे मातरम रिक्षा व टॅक्सी संघटना यांचा मेळावा रविवारी (दि.२७) सकाळी १० वाजता पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यासाठी संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यासाठी रिक्षा टॅक्सी संघटनेतील सदस्यांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष रवी नाईक यांनी केले आहे.

### सय्यद अकबर संयोजकपदी

**पनवेल :** भारतीय जनता पार्टी मुख्य कार्यालय नाशिक शहर येथे अल्पसंख्याक मोर्चाची क्लस्टर प्रमुख व



विधानसभा संयोजकांची बैठक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या वेळी प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांची १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघाच्या संयोजकपदी एकमताने निवड करण्यात आली. या वेळी मागील लोकसभेला ज्या मुस्लिम बहुल बुथावर मुस्लिम मते अल्पप्रमाणात पडली त्या बुथांवर बुथप्रमुख नेमून केंद्राच्या व राज्याच्या योजनांचा लाभ व इतर योजना त्यांच्या पर्यंत पोहचवून व त्यांच्या वेगवेगळ्या अडीअडचणी समजून घेऊन मुस्लिम मतांचा टक्का कसा वाढेल यावर विशेष चर्चा करण्यात आली.

# आमदार प्रशांत ठाकूर यांची भरभक्कम बांधणी

## विजयासाठी चौथ्यांदा सज्ज

**कळंबोली : दीपक घोसाळकर**

राज्यातल्या लोकशाहीच्या उत्सवातील विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी ही जोरदार सुरू आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी ही थेट लढत सर्वत्र दिसून येत आहे. पनवेलमध्ये या वेळच्या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती आघाडी जरी लढत असली तरी तिरंगी लढत होत असल्याने विकासाच्या जोरावर व केलेल्या समाजाभिमुख कामामुळे विद्यमान आमदार प्रशांत ठाकूर चौथ्यांदा विजय होऊन विधानसभेत जाणार असल्याचे एकंदरीत दिसून येत आहे.

तुल्यबळ व प्रबळ विरोधी उमेदवार नसल्याने तिरंगी लढतीचा फायदा हा प्रशांत ठाकूर यांना निश्चितच मिळणार आहे. नुकत्याच लोकसभेच्या निवडणुकीमध्ये महायुतीचे असलेले उमेदवार निवडून आलेले खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांना पनवेलमधून चांगलेच मताधिक्य मिळालेले आहे. लोकसभेच्या निवडणुकीत मिळालेले ३०,०००चे मताधिक्य कायम टिकणार असून त्यात निश्चितच वाढ होणार असल्याचे बोलले जात आहे.

राज्यातील एकूण विधानसभा मतदारसंघांपैकी पनवेल विधानसभा १८८ मतदारसंघ हा चौरस क्षेत्रफळाप्रमाणे कमी असूनही सर्वाधिक मतदार संख्या असलेला हा मतदार संघ आहे. पनवेलच्या ग्रामीण भागाबरोबरच सिडकोने वसवलेल्या कळंबोली, कामोठे, खारघर, खांदा कॉलनी, नवीन पनवेल या वसाहतींचा तसेच जुन्या पनवेलच्या क्षेत्रातील भागांचा समावेश आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघात एकूण सहा लाख ४५ हजारपेक्षाही जास्त मतदार आहेत. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत एकूण ३,१६,६६३ मतदान झाले होते त्यापैकी प्रशांत ठाकूर यांना १,७८,५८१ मतदान झाले होते तर त्यांचे विरोधी उमेदवार यांना ८६,२११ एवढेच मतदान झाले होते त्यामुळे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये प्रशांत ठाकूर यांना तब्बल ९२,३७० एवढे मताधिक्य मिळालेले होते.

सिडकोने वसवलेल्या वसाहतीमधून सर्व धर्म व सर्व भाषिक वर्ग हा बहुत करून मतदार आहे. पनवेल विधानसभा क्षेत्रातून विधानसभा निवडणुकीत कमळ चिन्हावर निवडणूक लढवून प्रशांत ठाकूर मोठ्या मताधिक्याने निवडून आले होते. त्यांनी प्रथम काँग्रेसच्या हात निशाणीवर निवडणूक लढवून विधानसभेत प्रवेश केला होता.



त्यानंतर सलग दोन वेळा ते आमदार म्हणून पनवेल मधून भाजपकडून कमळ निशाणी वर निवडून आलेले आहेत. यावेळेस चौथ्यांदा ते निवडणूक लढवीत आहेत. भाजपच्या पहिल्या यादीतच त्यांचे नाव आल्याने कार्यकर्त्यांमध्ये ही जल्लोषाचे वातावरण आहे. महाविकास आघाडीतर्फे एकच उमेदवार देण्याचे त्यांच्या समोर प्रथम ठरले असताना शेकापचे कोकण विभाग शिक्षक मतदार संघातील माजी आमदार बाळाराम पाटील यांची उमेदवारी जाहीर केल्याने महाविकास आघाडीमध्ये खदखद निर्माण झाली असल्याचे दिसून आले आहे.

महाविकास आघाडीच्या कोट्यातून शेकापला फक्त तीनच मतदार संघ दिले असल्याने चौथा उमेदवार उभा केल्याने महाविकास आघाडीत पेच निर्माण झाला आहे. त्यातच उबाठा गटाच्या शिवसेनेकडून जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनाही विधानसभा निवडणूक लढवण्याचे आदेश थेट मातोश्री वरून देण्यात आले आहेत, मात्र उबाठा गटाकडून माजी नगरसेविका लीना गरडही निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत तसे पाहता महाविकास आघाडीच्या उमेदवारांबाबत अद्यापही तळ्यात मळ्यात असल्याने प्रबळ दावेदार व लोकभिमुख कामाच्या जोरावर चौथ्यांदा आमदारकीची निवडणूक लढवणारे प्रशांत ठाकूर हे विजयाच्याच वाटेवर आहेत.

पनवेल विधानसभा क्षेत्रात होणाऱ्या तिरंगी लढतीमुळे त्यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाल्याचे बोलले जात आहे. जर एकास एक उमेदवार महायुती व महाविकास आघाडीकडून दिला असता तर त्याचा परिणाम हा तुल्यवर लढतीमध्ये झाला असता, परंतु मागील पाच वर्षात व महायुती शासनाने केलेल्या विविध विकासभिमुख कामामुळे प्रशांत ठाकूर यांचे पारडे निश्चितच जड असल्याचे दिसून येत आहे. त्यातच पनवेल महापालिकेच्या माध्यमातून विकास कामांचा धडाका हा शेकडो कोटीच्या उड्डाणाने घेतलेला आहे. त्याचाही चांगला परिणाम हा मतदानांमधून दिसून येणार आहे. लाडक्या बहिणीच्या योजनेमुळे महिला वर्गामध्ये उत्स्फूर्त वातावरण निर्माण झाल्याने त्याचा थेट व चांगला फायदा हा महायुतीचे उमेदवार प्रशांत ठाकूर यांना निश्चितच होणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या व पनवेल महापालिकेच्या विविध योजनांचा शुभारंभ हा निवडणुक जाहीर होण्यापूर्वी पनवेल विधानसभा क्षेत्रात केल्याने मतदारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पनवेलचा मध्य वस्तीत असणाऱ्या कळंबोली सर्कलच्या वाहतुकीच्या कोंडीच्या प्रश्न हा कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी केंद्रीय रस्ते विकास खात्याकडून त्याचे मंत्री नितीन गडकरी यांनी तब्बल ७०० कोटी रुपयेचा आराखडा मंजूर केला आहे. पनवेलमधील पूर्णत्वास असलेले आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासामुळे त्याचा चांगला परिणाम हा मतदारांच्या मतदानामधून होणार आहे.

कळंबोली, खांदा कॉलनी, कामोठे व खारघर यामध्ये सिडको व महापालिकेच्या माध्यमातून विकासात्मक होणाऱ्या कामांचा थेट परिणाम आगामी होणाऱ्या मतदानात चांगल्या प्रकारे दिसणार आहे. पनवेलमध्ये सुरू असलेला मेट्रो प्रकल्प हा मतदारांना चांगलाच भावला असून त्याचे श्रेयही आमदार प्रशांत ठाकूर यांना नागरिक देत आहेत. मेट्रोच्या प्रकल्पामुळे नागरिकांचे इंधन, पैसे आणि वेळ यामध्ये चांगल्या प्रकारे बचत होण्यास सुरुवात झाली आहे. पनवेल महापालिका सुरू झाल्यानंतर सर्वाधिक चर्चेत असलेला मालमत्ता कराचा विषय हा मतदारांशी थेट संबंध असलेला आहे, परंतु मालमत्ता करावरील लावण्यात आलेला दंड माफ करण्याची भूमिका राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवडणुकीपूर्वी जाहीर केल्याने पनवेलकरांच्या आशा चांगल्याच पल्लवीत झाल्या आहेत त्याचेही श्रेय हे पनवेलमधील नागरिक प्रशांत ठाकूर यांना देत आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर यांना राजकीय बाळकडू त्यांचे पिताश्री व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून मिळाले असल्याने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या समाजाभिमुख लोकसेवेची निश्चितच पोच पावती सलग तीन वेळा पनवेलमधील मतदारांनी दिली आहे. रामशेठ ठाकूर विकास मंडळाकडून जात पात धर्म पंथ न पाहता नागरिकांना, विद्यार्थ्यांना, गरजू रुग्णांना थेट आर्थिक मदतीचा लाभ कोणतेही अट शर्ती न लावता ते अनेक वर्षापासून देत असल्याने त्याचाही फायदा अनेक नागरिकांनी घेतलेला आहे.

शिक्षण, वैद्यकीय सेवा, क्रीडा क्षेत्रातील कामगिरी व विविध स्पर्धांच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या कार्याचा ठसा हा चांगलाच उमटवलेला आहे. त्यांच्यासाठी निवडणूक ही एक लोकशाहीतील फक्त प्रक्रिया आहे. जनतेची साथ ही त्यांना चांगलीच लाभलेली आहे. त्यामुळे विजयाची माळ ते निश्चितच खेचून आणतील यात तीळमात्र शंका नाही.

पनवेल विधानसभा क्षेत्रात झालेल्या विकासकामांच्या माध्यमातून पनवेलकरांनी एकच निर्धार केला आहे की, एकच वादा विधानसभेत चौथ्यांदा जाणार प्रशांतदादा, असे चित्र दिसून येत आहे.

## विद्यार्थ्यांकडून मतदारजागृती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या शिवनगर येथील शाळेत विधानसभा निवडणूक २०२४ स्वीप मतदार जनजागृती अभियान अंतर्गत घरोघर जाऊन विद्यार्थ्यांकडून पालकांना पत्र देऊन जनजागृती करण्यात आली.

माझे मत माझा अधिकार या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.

नागरिकांनी आपला मतदानाचा अधिकार कर्तव्य भावनेने बजवावा यासाठी मतदार जागरुकता आणि सहभाग कार्यक्रम अर्थात स्वीप अंतर्गत उरण-१९० विधानसभा मतदारसंघातल्या वासांबे ग्रामपंचायत अंतर्गत शिवनगर येथे वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले.

रा.जि.प.शाळा.शिवनगर च्या मुलांनी मतदान कराच, असे आवाहन चित्रांच्या माध्यमातून, रॅलीतून केले. मुख्याध्यापिका रजनी विनायक गायकवाड यांनी शिवनगरवाडीतील पालकांना मतदानाचा अधिकार जावण्याबाबत उद्बोधन केले.



(छाया : राकेश खराडे)



**मुंबई :** उरण तालुक्यातील पागोटे येथील सीडब्ल्यूसी कंपनीतील कामगारांच्या प्रश्नांबाबत आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पियुष गोयल यांची मुंबई येथे भेट घेतली. या वेळी मेघनाथ तांडेल, भार्गव ठाकूर, योगेश पाटील आदी उपस्थित होते. या कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी या वेळी आश्वासित केले. यामुळे या कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात प्रदूषणमुक्त दिवाळी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात आनंददायी शनिवार अंतर्गत शनिवारी (दि.२६) प्रदूषण मुक्त दिवाळी विद्यार्थ्यांनी साजरी केली.

प्रदूषणाचे होणारे दुष्परिणाम विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले आणि त्यामुळे विद्यालयामध्ये आकाश कंदील तयार करणे, रांगोळी काढणे व भेटकार्ड तयार करणे अशा विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी केली.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर यांनी या विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. स्पर्धांमध्ये विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षणाचे काम विद्यालयाच्या उपशिक्षिका पल्लवी पवार, आशा कस्पटे ववेदांगी म्हात्रे यांनी केले.

आकाश कंदील बनवणे यात प्रथम क्रमांक ईच्छा वानखेडे, द्वितीय क्रमांक तनया गंभीरे व तृतीय क्रमांक वैभवी सोमासे यांना मिळाला. रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक वैष्णवी देवकर, द्वितीय क्रमांक वैभवी सोमासे व तृतीय क्रमांक राशी खारकर यांनी पटकावला. भेटकार्ड तयार करणे यामध्ये प्रथम क्रमांक सोनिया ठाकूर, द्वितीय क्रमांक शरयू पोफळे व तृतीय क्रमांक समीक्षा सूर्यवंशी यांनी मिळविला.

सर्व विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ठाकूर यांनी अभिनंदन केले व विद्यार्थ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

## दुचाकीच्या धडकेने रिक्षाचालक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात दुचाकीच्या धडकेने रिक्षा चालक गंभीर जखमी झाल्याची घटना नवीन पनवेल ब्रीजकडे जाणाऱ्या सिग्नलजवळ पनवेल ते कळंबोलीकडे जाणाऱ्या मार्गावर घडली आहे.

किसन भालेकर (५३, रिक्षा चालक) यांनी त्यांची रिक्षा ही सावरकर चौकातून दोन खासगी व्यक्तींचे भाडे घेऊन नवीन पनवेल येथे जात असताना नवीन पनवेल ब्रीजकडे जायच्या रस्त्याच्या अगोदर सिग्नलला थांबून नंतर ग्रीन सिग्नल लागल्यावर जात असताना उजवीकडून येत असलेल्या अनोळखी मोटरसायकलने रिक्षाला उजव्या बाजूने धडक दिली.

झालेल्या अपघातात रिक्षा चालक किसन भालेकर हे गंभीर जखमी झाले आहेत व त्यानंतर मोटार सायकलस्वार पसार झाला आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा तपासी अंमलदार हनुमंत आहिरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पानशिलजवळ बस पेटली

**मोहोपाडा :** पानशिल गावाच्या हद्दीत रात्रीच्या सुमारास बसने अचानक पेट घेतला. बसचालकाला लक्षात येताच त्याने बस बाजूला उभी करून प्रवाश्यांना सुखरूप उतरवल्याने जिवितहानी झाली नाही.

भारत बेन्स कंपनीची लक्झरी बस मलकापूर ते विरार अशी पूणे ते मुंबई द्रुतगती महामार्गावरून जाताना मुंबई लेनवर पानशिल गावाच्या हद्दीत बसला शॉर्ट-सर्कीट होवून आग लागली. यात बस जळून खाक झाली. बसचालक संभाजी नामदेव नांगरे (वय ५०) यांनी रसायनी पोलिसांत खबर दिली असता रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक जाधव, सहाय्यक फौजदार कोळेकर अधिक तपास करीत आहेत.

## मतदार जागरूकता कार्यक्रम
## विद्यार्थ्यांना संकल्पपत्राचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल मतदारसंघ १८८ मध्ये मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता जनजागृती करण्यासाठी शनिवारी (दि.२६) पनवेल महानगरपालिका शाळा क्रमांक २ हुतात्मा हिरवे गुरुजी, शाळा क्रमांक ८ पोदी तसेच गुजराती शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पालकांना देण्यासाठी मतदान संकल्प पत्राचे वाटप करण्यात आले.


महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार व स्वीप कार्यक्रम प्रमुख शहरअभियंता संजय कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविण्यात आला.

लोकशाहीवर निष्ठा ठेऊन, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करु आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणात निवडणूकांचे पवित्र्य राखू. या निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावीखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू तसेच आमच्या कुटुंबातील सर्व मतदार, शेजारी व मित्र परिवार देखील मतदान करण्यासाठी प्रोत्साहीत करू या आशयाचे संकल्प पत्राचे वाटप विद्यार्थ्यांना पालकांना देण्यासाठी करण्यात आले.

विधानसभेची निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) अमंलबजावणी १८८ पनवेल अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात केली जात आहे. स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यासाठी स्वीप पथक प्रमुख शहरअभियंता संजय कटेकर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महापालिका हद्दीतील महाविद्यालयामध्ये तसेच शाळांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

# 'स्ट्रॅन्ड' आज ८२ वर्षांचे झाले असते...






ओटीटीने जगभरातील चित्रपट घरात पोहचलाय. मोबाईल स्क्रीनवर प्रवासापासून टॉयलेटपर्यंत कुठेही बसून चित्रपट पाहता येतो. आता तर महानगरांतील स्कायक्रॅपर्स हायफाय स्कायफाय बिल्डिंगमध्येही मिनी थिएटर असते. चित्रपट असा व इतका जवळ असूनही आणि तो पाहण्याची सुविधा वाढली तरी तुम्ही जुन्या काळातील सिंगल स्क्रीन थिएटर्स संस्कृतीत का रमला आहात? पुरे झाला हा फ्लॅशबॅक. आज फास्ट फॉर्वर्डचा जमाना आहे असे कोणी म्हटलं तरी ते मी आनंदाने स्वीकारतो, पण यात एक सच्चाई अशी की शहरातील सिंगल स्क्रीन थिएटर्स ते खेड्यापाड्यातील टूरिंग टॉकीज, तंबू थिएटर्स, कालांतराने शहरातील गल्लीपासून खेड्यापाड्यातून आलेली व्हिडीओ थिएटर्स यातून चित्रपट रसिकांनी टाळ्या शिट्ट्यांनी पिक्चर एन्जॉय केला म्हणूनच तर तो मल्टीप्लेक्स, ओटीटीपर्यंत जगला... त्यातीलच एक कुलाब्यातील स्ट्रॅन्ड सिनेमा!

या थिएटरशी माझा उशिरा संबंध आला, पण तो कायमच लक्षात राहण्याजोगा आहे. मी फक्त पिक्चर पाहत पाहत आलो नाही, त्या जगतातील अनेक गोष्टीही जाणून घेत घेत वाटचाल करीत राहिलो. मीडियात आल्यावर तर चित्रपटाचे बहुस्तरीय जग प्रत्यक्षात अनुभवतोय, भटकंती करतोय, लहान मोठ्या भेटीगाठी घेतोय.

दक्षिण मुंबईतील स्टर्लिंग, रिगल, इरॉस, न्यू एम्पायर ही अनेक वर्षे इंग्लिश चित्रपटाची हुकमी थिएटर्स म्हणून ओळखली जात असल्याने तेथे माझ्यासारखा रेडिओवर कसोटी क्रिकेट सामन्याच्या कॉमेन्ट्रीपुरताच इंग्लिशशी संबंध असलेला नि परीक्षेत इंग्लिशमध्ये पस्तीस गुणांनी काठावर पास होणारा या थिएटर्सच्या आसपास तरी कशाला जाईल? कधी एखादा हिंदी पिक्चर तेथे प्रदर्शित झालाच तर बघू असा सरळ सोपा दृष्टिकोन होता. सत्तरच्या दशकातील मध्यमवर्गीय कुटुंबात सरळ आयुष्य जगा हीच शिकवण असे. त्यात स्ट्रॅन्डला एखादा हिंदी चित्रपट रिलीज होताना तो त्याबरोबरच ग्रॅन्ट रोड परिसरातील एकाद्या थिएटरमध्येही असे. स्ट्रॅन्डमधून एक दोन आठवड्यात तो हिंदी चित्रपट उतरायचा.

मला आठवतंय सेन्सॉरने काही कटस सुचवलेला आणि धर्मेंद्र व रेखाच्या पोस्टरवरील धाडसी प्रणय दृश्यामुळे गाजलेला किमत (१९७३) हा रवि नगाईच दिग्दर्शित जेम्स बाँड स्टाईलचा, पण अस्सल मसालेदार हिंदी चित्रपट स्ट्रॅन्डला रिलीज झाला होता आणि स्ट्रॅन्डचे या पिक्चरचे थिएटर डेकोरेशन पाहण्यासाठी जायचे आम्ही गिरगावातील खोताची वाडीतील काही सवंगड्यानी ठरवले. तेवढ्यात समजले 'किमत' ड्रीमलॅन्डलाही येतोय. मग कशाला १३३ नंबरची बस पकडून कुलाब्याला जा. परवीन बाबीचा रूपेरी पडद्यावर पदार्पण करतानाचा बी.आर. इशारा दिग्दर्शित 'चरित्र' (१९७३) ड्रीमलॅन्ड लागला तोच एकाच आठवड्यात उतरला (क्रिकेटपटू सलिम दुराणी त्यात हीरो होता, बरं का?) आणि पुढच्याच शुक्रवारी तिची भूमिका असलेला 'धुंए की लकीर' (१९७३) ड्रीमलॅन्डसह स्ट्रॅन्डलाही लागला इतकेच. प्रेक्षक म्हणून स्ट्रॅन्डला जाण्याचे योग मला येत नव्हते आणि त्याची चक्क आवश्यकताही नव्हती. अनेकदा तेथे इंग्लिश चित्रपट प्रदर्शित होत आणि मराठी वृत्तपत्रात इंग्लिश चित्रपटाच्या जाहिराती येत नसत, पण हे थिएटर नेमके आहे कुठे, कसे आहे, किती मोठे आहे (इंग्लिश चित्रपटाचे आहे म्हणजे हायफाय असणार, रुबाबदार असणार हेही स्वाभाविकपणे त्यात आलेच.

**झूम प्रहर**

**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

जसे चित्रपट तशी त्याची थिएटर्स असाही एक फंडा सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृहांच्या काळात होता. त्यांच्या दीर्घकालीन इतिहासात तो आहे. चित्रपट अभ्यासक्रमात हेही यायलाच हवे. चित्रपटाचा जन्म जसा महत्त्वाचा तशीच त्याची चित्रपटगृहातील वाटचालही महत्त्वाची), स्ट्रॅन्डचे पोस्टर डेकोरेशन कसे असते यांची उत्तरे हवी असतील, त्याचा 'आंखो देखा हाल' अनुभवायचा तर कुलाबा मार्केटमध्ये जायलाच हवे. अनेक चित्रपटगृहे महत्त्वाच्या कॉर्नरला असताना हे भर भाजी, कडधान्य, फिश वगैरेच्या गर्दीत मार्केटमध्ये कसे हा प्रश्न पडत होता. कदाचित जेव्हा म्हणजे ३० ऑक्टोबर १९४२ साली अर्थात इंग्रजांच्या काळात सुरू झाले तेव्हा येथे छोटेसेच मार्केट असेल.

स्ट्रॅन्डचा पहिला चित्रपट होता, लक्झरी पिक्चर्स हाऊसचा 'Sergeant York'. यात गॅरी कपूर हा अमेरिकन हीरो होता आणि या चित्रपटात युद्धभूमीवरील थरारक प्रसंग आहेत असे तेव्हा बातमीत म्हटले होते. (सहजच एक प्रश्न मनात येतोय, इंग्रजांच्या काळात दक्षिण मुंबईत इंग्लिश कंपन्यांनी उभारलेली चकाचक पॉलिश्ड सिनेमा थिएटर्स प्रामुख्याने आपल्याला विदेशातून येत असलेले इंग्लिश चित्रपट पाहण्यासाठी उभारली नाहीत ना? म्हणजे त्यांचा मुख्य हेतू तोच असावा का?) स्ट्रॅन्डसमोर उभा राहिलो तेव्हा त्याचा साहेबी थाट आणि त्यावरची इंग्लिश पिक्चर्सचे होर्डिंग्स, शो कार्ड्स मला परकेपणाची जाणीव करून देत होता. माझ्यासारख्या मध्यमवर्गीय चाळ संस्कृतीत वाढलेल्याने नि तशीच जीवनशैली असलेल्याने गेट वे ऑफ इंडियाला फिरायला आल्यावर जाताना थोडं पुढे येत स्ट्रॅन्ड पहावे असे माझ्या मनात घट्ट बसले आणि स्ट्रॅन्डपासून मी मनाने कायमच दूर रहायचे ठरवले. (मै अपनी औकात को सही वक्त पहेचान गया असा कादर खान स्टाईल संवाद माझ्या मनात आला. हिंदी चित्रपट डायलॉगनेही गाजण्याचा तो काळ होता.)




कालांतराने चक्क हेच स्ट्रॅन्ड कायमचे आठवणीत राहीले. म्हटलं ना, 'टॉकीजच्या गोष्टी'शी माझे असलेले नाते काही वेगळेच आहे. मी फक्त आणि फक्त चित्रपट पाहिले नाहीत, समिक्षा केली नाही, तर थिएटर संस्कृतीही जाणून घेतली. याचे कारण जनसामान्यांचा जास्त संबंध चित्रपटगृहाशी येत राहिला. चित्रपटसृष्टीचे जग त्याच्यापासून कायमच दूर राहिले. सिनेमा थिएटर मात्र जवळ होते, सवयीचे होते. म्हणूनच चित्रपटगृहाचा इतिहास जास्तच महत्त्वाचा. त्यात चित्रपट पाहिला गेला.

मी मीडियात आलो आणि १९८४च्या जानेवारीत मुंबईत भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे अर्थात इफ्फीचे आयोजन करण्यात आले होते. आता पणजीत (गोवा) नोव्हेंबर महिन्यात रंगत असलेला इफ्फी पूर्वी जानेवारीत आयोजित केला जाई आणि एक वर्ष नवी दिल्ली व एक वर्ष चित्रपट निर्मितीचे केंद्र असलेले शहर (मुंबई, हैदराबाद, कोलकत्ता, बंगलोर, त्रिवेंद्रम वगैरे) असा तो आलटूनपालटून असे. मुंबईत या इफ्फीचे मुख्य केंद्र मेट्रो थिएटर होते. न्यू एक्सलसियरला पॅनोरमा, स्ट्रॅन्डला भारतीय आणि विदेशी सिनेमावाल्याच्या चित्रपटांचा सिंहावलोकन विभाग होते. अर्थात मी स्ट्रॅन्डला शक्य तितके भारतीय चित्रपट पहायचे ठरवले आणि त्यात गुरुदत्त दिग्दर्शित 'प्यासा', 'कागज के फूल' वगैरे चित्रपट होते. माझ्यासाठी यामुळेच स्ट्रॅन्डचे दरवाजे उघडले तरी माझ्या मनात मध्यमवर्गीय संकोच होताच. पडद्यावर 'प्यासा' सुरू होताच मी सिनेमाशी जोडला गेलो. स्ट्रॅन्डचा एकूणच रुबाब भारीच होता. बाल्कनी तर स्टाईलीश. 'इफ्फी'च्या निमित्ताने स्ट्रॅन्डला आणखीन काही चित्रपट पाहताना थिएटरच्या रेड कार्पेट संस्कृतीशी ओळख वाढवायचा प्रयत्न केला. त्या काळातील प्रेक्षक असा असे. मला गिरगावातील सेन्ट्रल, इंपिरियल, सुपर टॉकिजची सवय. ती अतिशय साधी चित्रपटगृह. त्यात माणसेही साधीच भावना ठेवून येत.

काही वर्षातच पुन्हा स्ट्रॅन्डजवळ जायचा योग आला. या वेळी कारण वेगळेच होते. बी. सुभाष दिग्दर्शित 'टारझन' (१९८५) अचानक सुपर हिट झाला आणि किमी काटकारचा टेलिफोन नंबर मिळवण्यासाठी धडपड सुरु झाली (पिक्चर हिटचे साईट इफेक्ट्स असे अनेक असतात. चित्रपट संस्कृतीत हेही असते.) त्या काळात अनेक स्टार आम्हा सिनेपत्रकारांना मुलाखतीसाठी घरीच बोलवत. किमी काटकरची आई मला फोनवर म्हणाली, कोलाबा मे स्ट्रॅन्ड सिनेमा के सामने हम रहते है... आजही जेव्हा जेव्हा एखाद्या म्युझिक चॅनलवर किमी काटकरचे एकादे गाणे पाहतो तेव्हा स्ट्रॅन्ड थिएटर पटकन आठवते (आणि अर्थातच किमी काटकरची भेटही आठवते.)


काही वर्षातच याच स्ट्रॅन्डमध्ये एक मिनी थिएटर असून तेथील तन्वीर अहमद दिग्दर्शित 'आकर्षण' (१९८८) या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये सहभागी होण्याचे आमंत्रण रजनी आचार्य याच्याकडून आले. दृश्य काय होते? तर 'आकर्षण सिनेमात सिनेमा होता' आणि त्या सिनेमाच्या ट्रायलला अकबर खान आणि सोनू वालिया यांच्यासोबत आम्ही सिनेपत्रकार आहोत, म्हणजे आम्हाला अभिनयाची संधी होती की आम्ही ओरिजनल भूमिकेत होतो? अकबर खान, सोनू आणि आम्ही सगळ्यांनीच शूटिंग एन्जॉय केले. म्हणून शूटिंग आणि स्ट्रॅन्ड दोन्ही लक्षात राहीले...

नव्वदच्या दशकात कुलाब्यातील मुकेश मिलमध्ये एखाद्या हिंदी चित्रपटाचे शूटिंग रिपोर्टिंग अथवा मुलाखतीसाठी गेल्यावर अधूनमधून स्ट्रॅन्डवर चक्कर मारायचो. आपली सिनेपत्रकारितेची पाळेमुळे सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये खोलवर रूजलीत हे मी कधीच विसरणार नाही याच भावनेने स्ट्रॅन्डवर जायचो...

कालानंतरने तेही बंद झाले आणि हळूहळू हे बंद थिएटर उदास, भकास वाटू लागले. अशी नि:शब्द इमारत काय पहायची. आज स्ट्रॅन्डचा शो सुरू असता तर थिएटर ८२ वर्षांचे झाले असते. अशा वेळी स्ट्रॅन्डशी निगडित जुन्या चांगल्या आठवणी काढाव्यात. त्याचीच ही 'टॉकीजची गोष्ट'. इंग्रजी चित्रपटाच्या चित्रपट रसिकांना स्ट्रॅन्ड आठवतो, मॅकनॉज गोल्ड, डर्टी डझन अशा बहुचर्चित चित्रपटांसाठी. त्यांचा स्ट्रॅन्डकडे पाहण्याचा अँगल अर्थात माझ्यापेक्षा वेगळाच...

चित्रपटाच्या इतिहासात तो चित्रपट प्रेक्षकांपर्यंत कसा कसा पोहचत आला हे जास्तच महत्त्वाचे! तो एक बहुस्तरीय, माहितीपूर्ण, रंजक आणि अगणित चित्रपट रसिकांच्या आठवणी व अनुभवाचा प्रवास आहे. वाचकहो, तुमच्याही चित्रपट पाहण्याच्या अशाच अनेक आठवणी असतीलच... कोणाच्या मोठ्या शहरातील असतील, तर कोणाच्या तालुक्यातील थिएटरच्या असतील...

# राज्य नाट्य स्पर्धेत पुरस्कारप्राप्त तीन नाटके




नाटक हा थोडा कठीणसा साहित्यप्रकार आहे. फारच थोडे साहित्यिक, कथाकार, कादंबरीकार, कवी हे उत्तम नाटककार म्हणून प्रसिद्ध झाले आहेत. कुठलाही लेखक आपल्या कल्पनाशक्तीने कथा, कादंबरी, कविता यांची निर्मिती करीत असतो. वाचक तो एकटाच वाचून लेखकाने रंगवलेले भावविश्व आपल्या डोळ्यासमोर उभे करत असतो. पुस्तक रूपात असलेले नाटकदेखील वाचक वाचत असला तरी ते समूहाने पहावे, ऐकावे, अनुभवावे या दृष्टीने लिहिणे अपेक्षित असते. त्यामुळे त्या नाट्य लेखकाने लिहिलेले नाटक हे रंगमंचावर सादर होऊ शकेल असे असायला हवे. त्यासाठी त्याला एकंदरीत रंगमंचाच्या मर्यादांची एकूण कल्पना असायला हवी.

या नाट्यसंग्रहातील 'मिशन व्हिक्टरी', 'चाँद तारा' आणि 'संगीता फिरोज फडके' या तीन नाटकातून लेखक महेंद्र कुरघोडे यांना नाट्यतंत्राची पुरेपूर जाण आहे याची प्रचिती येते. या तिन्ही नाटकांचे विषय हे वैश्विक, वैचारिक आहेत, परंतु लेखकाच्या ठायी असलेला नाट्यतंत्राचा प्रदीर्घ अनुभव, स्टेज क्राफ्टची सखोल माहिती यामुळे या सर्व नाटकांची प्रभावी मांडणी लेखकाला करता आली आहे. ही नाटके पुस्तक रूपाने जरी प्रकाशित होत असली तरी या नाटकांना महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत प्राथमिक फेरीत प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले आहे.

'यूएसएसआर'चं विघटन झाल्यावर रशियाच्या अंगणातील अनेक देशात सत्ता बदल झाले. अनेक देशात सशस्त्र क्रांतीला तोंड फुटले. त्यातीलच एक देश इस्तोनिया. इस्तोनिया लिबरेशन फ्रंट हुकुमशहा व सरंजामी प्युझोची सत्ता उलटवून टाकते. लोकशाही नैतिक मूल्य जपणारी सॅव्हियोची प्रेयसी स्टेला व तिचे वडील डॉ. डीएगो साव्हीयोच्या सशस्त्र क्रांतीला सर्वार्थाने मदत करतात. या धकाधकीत डॉक्टर डीओगो यांना आपला जीव गमवावा लागतो. पुढील दोनच वर्षात समाजवाद व साम्यवादाची भाषा करणाऱ्या सॅव्हियोची पावलं हुकूमशाहीकडे वळतात. परिणामी सॅव्हियोची प्रेयसी स्टेला ही डॉ. डीएगो ह्युमन राईट फेडरेशनची स्थापना करते व सॅव्हियोच्या विरोधात इस्तोनियामधील जनतेचं जनमत जागं करते. हुकूमशाही आणि साम्यवादाच्या अंधुकशा सीमारेषेवर घुसमटलेली ससॅव्हियो व स्टेलाची प्रेमकथा ही शोकांतिका ठरते. स्टेलाने उभं केलेलं बंड मोडण्यासाठी सॅव्हियोनी केलेली कारवाई वाचकाच्या संवेदनाचा ठाव घेते. मिशन व्हिक्टरी हे काल्पनिक कथा असलेलं नाटक संदर्भासहित तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीची ओळख करून देतं. मिशन व्हिक्टरी हे परदेशी मातीवरचे नाटक तर संगीता फिरोज फडके हे संपूर्णपणे भारतीय मातीतल्या आजच्या समस्येवरील नाटक. हे नाटक 'लव जिहाद' या अतिशय संवेदनशील विषयाशी निगडित आहे. प्रसिद्ध ब्रिटिश तत्त्वज्ञानी जॉन स्टुअर्ट मिल म्हणतो, सत्य स्वयंभू नसतं. ते परस्पर विचारांच्या तात्विक संघर्षातून बाहेर येतं तसेच कोणतीही गोष्ट पूर्णपणे खोटी कधीच नसते. त्यात सत्यांश असतोच.

संगीताचा प्राध्यापक नवरा फिरोज व त्याची हिंदू विद्यार्थिनी चंदा या दोघांचं बेपत्ता होणं या मुख्य रहस्यमय कथानकाभोवती जीवघेण्या हितसंबंधाचे उपकथानक या नाटकात उलगडत जातं. लव्ह जिहादसारख्या अतिसंवेदनशील मुद्द्यावर तटस्थपणे व नि:पक्षपातीपणे आपले विचार मांडणारं संगीता फिरोज फडके हे नाटक वाचकाला विलक्षण नाट्यनुभव देण्यात यशस्वी होतं.

लेखक नाट्यमय घटनांची मांडणी करताना राघव पुराणिक (पत्रकार) संगीता फडके, कदम इन्स्पेक्टर, दादासाहेब या दमदार व्यक्तिरेखा उभ्या करतो तसेच फिरोज व चंदा या दोन व्यक्तिरेखा प्रत्यक्ष रंगमंचावर न आणतादेखील या व्यक्तिरेखाचं अस्तित्व नाटकात जाणवत राहतं.

लेखकाने हे नाटक नागपूरमध्ये घडलय असं दाखवलं आहे, पण यातील एकही पात्र वैदर्भीय भाषा बोलत नाही ही त्रुटी जाणवते. गेल्या पंधरा वर्षात आपल्या देशातील धार्मिक उन्माद पराकोटीचा वाढला आहे. मीडियामुळे समाजाचा बुद्धिभेद सहज करता येतो. लव्ह जिहाद या संवेदनशील विषयाला हात घालल्याबद्दल लेखकाचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे.

चाँद तारा हे नाटक आणखी वेगळ्या पठडीतलं आहे. या नाटकाचा काळ हा पानिपत युद्धानंतरचा व आजचा असा आहे. या विषयावर नाटक सूचणे हेच विलक्षण आहे.

१४ जानेवारी १७६१ या दिवशी पानिपत येथे अब्दालीने ४० हजार मराठा सैन्य कापून काढलं. २२ हजार मराठा युद्ध कैद्यांना बलुचिस्तान ध्ये कलत नवाबाला गुलाम म्हणून विकलं. आज अडीचशे वर्षानंतरही त्याची १७वी पिढी बलुचिस्तानमध्ये मुहाजीराच लाजिरवाणं जीणं जगत आहे. त्यांची ओळख आहे 'बुगटी मराठा'. हा थरारक इतिहास लेखक पहिल्या अंकात मांडतो, तर दुसऱ्या अंकात सांप्रतकाळात भारतीय रॉ इंटेलिजन्सीने बलुचिस्तान रिपब्लिकन आर्मी व बुगटी मराठा यांना हाताशी धरून ग्वादरमधील 'सीपीईसी'ला दिलेले हादरे. क्वेट्टाधील महंमद अली जिन्हाचा उद्ध्वस्त केलेला २५ फूट पुतळा, झैरतमधील जिन्हाची जाळलेली हवेली हे प्रत्यक्ष रंगमंचावर दाखवून अडीचशे वर्षाच्या इतिहासाचा नाट्यमय पट रंगमंचावर साकार करण्यात लेखक पूर्णपणे यशस्वी झाला आहे.

इतिहासाची सखोल जाणीव आणि वर्तमानाशी त्याची नाळ जोडणे हे महेंद्र कुरघोडे यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. 'मिशन व्हिक्टरी', 'चाँद तारा' व 'संगीता फिरोज फडके' या तिनही नाटकांकडे नजर टाकली तर लेखकाची विविध विषयाची विषय मांडण्याची भूक लक्षात येते. वेगवेगळ्या ईझमचा अभ्यास करता करता त्यावर भाष्य करता करता लेखकाला स्वत:चा स्वतंत्र राजकीय विचार सापडलाय असे या तिन्ही नाटकांमधून सिद्ध होतं.

**–कुमार सोहोनी,**
**सिने–नाट्य दिग्दर्शक**

# सावध व्हा! नकळत भेसळीचे विष प्राशन होतेय



आजच्या काळात शुद्ध व पोषक अन्न मिळविणे फार कठीण झाले आहे, कारण प्रत्येकजण स्वत:च्या फायद्यासाठी दुसऱ्यांचा जीव घ्यायला तयार आहे. गेल्या काही वर्षांत देशात कर्करोग, हृदयविकार, ब्रेन स्ट्रोक आणि मानवी अवयव निकामी होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. सर्व वयोगटातील लोकांमध्ये अकाली मृत्यूचे प्रमाण सतत वाढत आहे आणि मानव शारीरिक व मानसिकदृष्ट्या दुर्बल होत चालला आहे. भेसळीचे विष आणि विषारी प्रदूषण हेच या समस्यांचे मूळ आहे.

नकळत का होईना भेसळ आणि प्लास्टिकचे विष आपण रोज सेवन करत आहोत. आशिया खंडातील सर्वात मोठ्या रुग्णालयांमध्ये गणल्या जाणाऱ्या जगप्रसिद्ध तिरुपती मंदिरातील प्रसाद लाडूमध्ये प्राण्यांच्या चरबीचे भेसळ उघडकीस आली. पिकांवर भाज्यांवर हानिकारक कीटकनाशकांची फवारणी करणे, धान्य पॉलिश करणे, खाद्यपदार्थांना आकर्षक बनवण्यासाठी घातक रासायनिक रंग वापरणे, फळे लवकर पिकविण्यासाठी जीवघेण्या रसायनांचा वापर करणे आणि बनावट खाद्यपदार्थांचा सर्रास वापर करून सर्वसामान्यांच्या आरोग्याशी आणि जीवाशी खेळ केला जात आहे. पिकांवर फवारलेल्या कीटकनाशकांचा विषारी परिणाम यावरून अंदाज लावता येतो की फवारणी करताना निष्काळजीपणा केल्यास एखाद्या व्यक्तीला लगेच जीव गमवावा लागतो. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या मते, २०२० ते २०२१ या काळात भारतात कीटकनाशकांच्या विषबाधेमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत सहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या आठवड्यात नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात शेतातून वाहणारे पाणी पिऊन वाघाचा मृत्यू झाला, कारण ते कीटकनाशके मिसळलेले विषारी पाणी होते.

आपल्या देशात सण येताच काही निवडक वस्तूंची मागणी वाढते आणि मागणी वाढूनही वस्तूंचा पुरवठा कमी होत नाही हे आश्चर्यकारक आहे. उदाहरणार्थ, आपल्या महाराष्ट्रात कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी दुधाचे खास पेय बनवले जाते. या दिवशी दुधाची मागणी इतर दिवसांच्या तुलनेत दुपटीपेक्षा जास्त असली तरी पुरवठा मात्र त्याहून अधिक होतो. आता असे होऊ शकत नाही की केवळ विशेष दिवशी दुभती जनावरे दुप्पट दूध देतात आणि उत्पादन एका दिवसात दुप्पट होते. जर एक गाय एका दिवसात १० लिटर दूध देते, तर ती दररोज १० लिटरच दूध देणार, मग बाजारात अचानक दुधाचा पुरवठा कसा वाढतो? कंझ्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वार्षिक अहवालात असे आढळून आले आहे, देशातील प्रत्येक तिसरा माणूस भेसळ दुधाचे सेवन करत आहे.

या भेसळयुक्त खाद्यपदार्थांपासून आरोग्य कसे वाचवायचे? असा गंभीर प्रश्न उपस्थित होतोय. कमी दर्जाच्या आणि भेसळयुक्त खाद्यपदार्थांच्या वापराच्या बाबतीत सध्या आपण शिखरावर आहोत. डॉक्टर म्हणतात जंक फूड वाईट, फळे खाणे चांगले, पण आता बाजारात फळे खरेदी कशी करणार? फळे लवकर खराब होतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्यावर होणारी घातक रासायनिक प्रक्रिया आणि दुसरे कारण म्हणजे क्षणाक्षणाला बदलणारे हवामान.

आजच्या पिढीला बाहेर खायला आवडते, त्यांना सर्व काही झटपट हवे असते, दर्जा नसला तरी चव महत्त्वाची असते. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या अनेक व्हिडीओंमध्ये रस्त्यावरील रंगीबेरंगी खाद्यपदार्थ आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे पहायला मिळते. २०–३० रुपयांच्या डिशमध्येही भरपूर लोणी आणि चीज टाकले जाते. कमी दर्जाचे पदार्थ, पॅकेज केलेले मसाले, सॉसेज, चटण्या, तेल यांचा जास्तीत जास्त वापर केला जातो. अनेकवेळा खाद्यपदार्थ तळल्यानंतरही ते तेल पुन्हा पुन्हा वापरले जाते. गरम पदार्थांमध्येही प्लास्टिकचा वापर अत्यंत हानिकारक आहे, तरीही त्याचा वापर केला जातो. अशा बहुतेक पदार्थांमध्ये गुणवत्तेशी तडजोड केली जाते आणि पोषक तत्वांऐवजी केवळ विषारी घटक दिसतात. बाहेरील खाद्यपदार्थांमध्ये भेसळयुक्त घटकांचा वापर होण्याची दाट शक्यता असते. उदाहरणार्थ, जर आपण बाजारातून मसाले, हळद, लाल मिरची आणून घरी ग्राइंड करून मसाला बनवला, शेंगदाण्यापासून तेल, दुधापासून चीज, टोमॅटोपासून सॉस बनवला, तरीही एवढी मेहनत करूनसुद्धा आपले उत्पादन बाजारातील तयार उत्पादनापेक्षा कितीतरी पटीने महाग असेल. मग बाजारात एवढ्या स्वस्तात उत्पादने कशी विकली जातात?

भेसळयुक्त अन्न अत्यंत विषारी असते आणि ते खाल्ल्याने अतिसार, मळमळ, ऍलर्जी, मधुमेह, हृदयविकार, किडनीचा कर्करोग, लॅथिरिझम, मज्जासंस्थेशी संबंधित व यकृतासह अवयव निकामी होणे असे आजार होतात. काही भेसळीमध्ये कार्सिनोजेनिक, क्लॅस्टोजेनिक व जीनोटॉक्सिक गुणधर्म आढळून आले आहेत. २०१९मध्ये भारतात दूषित पाण्यामुळे पाच लाखांहून अधिक मृत्यू झाल्याचे लॅन्सेट अभ्यासात आढळून आले आहे. आपल्या देशातील बहुतेक अन्नपदार्थांमध्ये हानिकारक घटक असतात, बनावट दारूमुळेसुद्धा देशात दरवर्षी मोठ्या प्रमाणात मृत्यू होतात. जंक फूड, मैदा, साखर, मीठ, तेल हे आधीच स्लो पॉयझनसारखे काम करत आहेत आणि आपल्याला जीवघेण्या आजारांना बळी पाडत आहेत. वाढते प्रदूषण आपला श्वास हिरावून घेत आहे. लॅन्सेटच्या अभ्यासानुसार २०१९मध्ये प्रदूषणामुळे देशात २३ लाखांहून अधिक अकाली मृत्यू झाले. भेसळीच्या या जगात कोणती गोष्ट शुद्ध आहे याची शाश्वती नाही. जागरूक राहा, देखाव्याला बळी पडू नका, जिभेवर नियंत्रण ठेवा, आरोग्याची काळजी घ्या, घरगुती खाद्यपदार्थांना प्राधान्य द्या व निरोगी राहा.

**–डॉ. प्रितम गेडाम**

# विनातिकीट १०३ जणांकडून दंड

## मध्य रेल्वेच्या तेजस्विनी विशेष बॅचची कारवाई



**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या दुर्गा मुख्य तिकीट परीक्षक सुधा द्विवेदी तेजस्विनी विशेष बॅच यांनी वैध तिकिटांशिवाय प्रवास करणाऱ्या १०३ प्रवाशांना शोधून दंड आकारून शतक पार केले आहे.

मध्य रेल्वेच्या तेजस्विनी विशेष बॅचने सर्व महिला तिकीट तपासणी बॅचसह, अनियमित किंवा विनातिकीट प्रवासाची ३१८ प्रकरणे नोंदवली आहे. प्रति कर्मचारी सरासरी ३५ प्रकरणांच्या प्रभावी कामगिरीसह एकूण रु. ९६,२४० इतका दंड वसूल केला जो प्रति कर्मचारी १०,६९३ रुपये एवढी आहे.

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातर्फे विविध स्थानकांवर 'नव दुर्गा' पथकाद्वारे विशेष तिकीट तपासणी मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई विभागाच्या सर्व महिला विशेष तिकीट तपासणी बॅचेस तेजस्विनी द्वारे राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश तिकीट-तपासणीच्या प्रयत्नांना बळकटी देणे, विशेषत: सणासुदीच्या वेळी योग्य आणि वैध तिकिटांसह प्रवास करण्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे.

प्रवाशांमध्ये अनुपालन सुनिश्चित करत आहेत. या कालावधीत या बॅचने वैध विनातिकिट प्रवास करणाऱ्या एकूण ११,९७१ प्रवाशांना पकडले आहे आणि ३३,९८,७३२ रुपये इतका दंड वसूल केला आहे. यामध्ये वातानुकूलीत लोकलमधील १८६० प्रवाशांकडून ६,४८,५७० रुपये दंड वसूल केला गेला. प्रथम श्रेणीतील ४६२२ प्रकरणात प्रवाशांकडून १४,३८,५५० रुपये दंड म्हणून वसूल केला गेला. द्वितीय श्रेणीतील ४६६४ प्रकरणात प्रवाशांकडून १२,१५,८८२ रुपये दंड वसुली. बुक न केलेले सामान असलेले ८२५ प्रकरणी प्रवाशांकडून ९५,७३० रुपये दंड वसूल केला गेला.

तेजस्विनी बॅचेस, नियमित तिकीट तपासणी मोहिमेद्वारे प्रवाशांना आरामदायक प्रवास देण्यासाठी आणि स्थानकांवर आणि गाड्यांमध्ये त्यांच्या उपस्थितीने प्रवासी वैध तिकीट खरेदी आणि प्रवास करतील याची खात्री करतात. हा उपक्रम प्रवासी-अनुकूल वातावरण राखून प्रवासी नियमांची अंमलबजावणी करण्याच्या रेल्वे प्रशासनाच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकतो. नवरात्रीच्या उत्साहात आणि दिवाळीच्या सणासुदीच्या काळात सुरू असलेल्या या विशेष तिकीट-तपासणी मोहिमा शक्तीच्या प्रतीक आहेत ज्यामध्ये महिला कर्मचारी सामर्थ्य आणि समर्पण रूप देत आहेत. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रेल्वे प्रशासन सहभागी कर्मचाऱ्यांचे त्यांच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाबद्दल त्यांचे मनःपूर्वक कौतुक करते.

मध्य रेल्वे प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी योग्य आणि वैध रेल्वे तिकीट खरेदी करून सन्मानाने प्रवास करण्याचे आवाहन केले आहे.

# निवडणूक आचारसंहितेमध्ये पेण येथे पोलिसांचे संचलन

**पेण : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक आचारसंहितेमध्ये कायदा व सुव्यवस्था पालन व्हावे या दृष्टिकोनातून पेणमध्ये पोलिसांचे रूट मार्च आयोजित करण्यात आला होता.

उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे व पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या नेतृत्वाखाली हा रूट मार्च काढण्यात आला होता. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महावीर मार्ग, खाटीक आळी, राजू पोटे मार्ग, धरमतर रोड, कोतवाल चौक असे संचलन करत पोलीस उपविभागीय कार्यालयाच्या आवारात या रॅलीचे विसर्जन करण्यात आले.

या वेळी रॅलीत १ उपविभागीय पोलीस अधिकारी, एक पोलीस निरीक्षक, २ अधिकारी, १६ अंमलदार, सीआयएसएफचे १ अधिकारी व ४९ जवान यांनी सहभाग घेतला होता. या वेळी सायंकाळी खरोशी, दुरशेत, वडखळ व दादर सागरी पोलीस ठाणे हद्दीतही रूटमार्च काढण्यात आला होता.



# चौल येथील ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चौल ग्रामपंचायत हद्दीतील तुलाडदेवी नजीकच्या बवळे गल्ली येथील ग्रामस्थ व महिलांनी शिवसेना-शिंदे गटात पक्ष प्रवेश केला आहे.

चौल येथे महायुतीच्या प्रचार सभेत शिवसेना-शिंदे गटाचे अलिबाग-मुरूड विधानसभा आमदार महेंद्र दळवी यांचे कार्यप्रणाली व विकास कामांच्या झंझावाताने प्रेरीत होवून चौल बवळे गल्ली मधील ग्रामस्थ व महिलांनी शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश केला.



ऐन विधानसभा निवडणुकपुर्व चौल मधील बवळे गल्ली ग्रामस्थ व महिलांच्या शिवसेना पक्ष प्रवेश विशेष महत्त्वपूर्ण ठरला आहे. चौल बवळे गल्ली ग्रामस्थ व महिलांनी मोठ्या संख्येने शिवसेना-शिंदे गटात पक्ष प्रवेश केला. त्याचे स्वागत आमदार महेंद्र दळवी व मुंबईचे माजी नगरसेवक मंगेश सातमकर यांनी भगवी शाल परिधान करून पुष्पगुच्छाने स्वागत केले.

हा पक्ष प्रवेश कार्यक्रम शिवसेना विधानसभा संघटिका तनुजा भुषण घरत, आग्राव शाखाप्रमुख ज्योती शैलेश मुंबईकर, तुलाडदेवी शाखा प्रमुख प्राजक्ता नितिन राउत, उपशाखा प्रमुख शितल अमित राउत, धडाडीचे कार्यकर्ते अशोक गुरव, निखिल राउत, अमित राउत, शुभम राउत, नितिन राउत,यांचे विशेष परिश्रमाने झाला. या वेळी व्यासपीठावर आमदार महेंद्र दळवी यांच्यासह जिल्हा प्रमुख राजा केणी, जिल्हा उपाध्यक्ष शैलेश चव्हाण, जिल्हा नियोजन समिती सदस्य संतोष निगडे, तसेच महायुतीचे विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# रोह्यात बांधलेल्या मंदिरात दत्तगुरूंची प्राणप्रतिष्ठा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगर येथे अत्यंत आकर्षक मंदिरात दशग्रंथी पंडिताच्या मंत्र घोषात विधिवत श्री. गुरुदेव दत्ताची धार्मिक पद्धतीने प्राणप्रतिष्ठा सोहळा करण्यात आले आहे.

कोकणातील कुठे नसेल असे अत्यंत उत्कृष्ट आणि आकर्षक मंदिराचे डिझाईन आणि प्रत्यक्ष उभे राहून अतिशय मेहनत घेऊन तरुण आर्किटेक्त कौस्तुभ उदय कोंडे यांनी या मंदिराचे कामपूर्ण केले. मंदिरात प्राणप्रतिष्ठा निमित्ताने सकाळी होम, हवन, पूजा, अभिषेक, आरती आणि प्रसाद नैवेद्य असे धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. दिवसभर दत्तगुरूंची गोड गीतांनी परिसर दुमदुमला होता. विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये पालखी सोहळा निरनिराळ्या वाद्य आणि फटाक्याच्या आतषबाजीत झाला. या वेळी पुरुष मंडळींनी गुरुशर्ट कुर्ता तर महिलांनी नऊवारी साड्या परिधान करून पारंपारिक वेषभुषा केली होती.



सायंकाळी रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, निवासी नायब तहसीलदार राजेश थोरे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, आप्पा देशमुख, राजेश कापरे प्रशांत देशमुख, कोंढाळकर, माजी उपनगराध्यक्ष समीरभाई सकपाळ, नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष, नगरसेवक, व्यापारी वर्ग, वैद्यकीय अधिकारी, निरनिराळ्या क्षेत्रांतील मान्यवर, औधोगिक वसाहती मधील अधिकारी, कामगार हजारांच्या संख्येने दर्शनासाठी आवर्जून आले होते.

या मंदिराच्या बांधकामासाठी निरनिराळ्या मान्यवरानी गुरुदेव दत्ताच्या भक्तीपोटी साहाय्य केले त्यांचा अरुण करंबे, सतीश देशमुख आणि मंदिर पूर्ण होण्यासाठी अतिशय मेहनत घेतलेले भालचंद्र पवार व नितीन प्रभू यांच्या हस्ते मान्यवराचा यथोचित सत्कार सन्मान केला. विदीत किंजवडेकर, सतीश कुलकर्णी, पवार बंधू, माधव देशमुख आणि परिसरानतील कार्यकर्ते यांनी मनापासून आणि उदय कोंडे यांनी सर्वोतरी मदत केली.

येथील आम्ही रोहेकर फाउंडेशन या सेवाभावी संस्थेतर्फे उदय कोंडे, अध्यक्ष महावीर जैन, विलास गुजर हितेंद्र शाह यांनी ७-८ फुटी पाम ट्रि झाडे मंदिराच्या परिसरात सभोताली लावून वृक्षारोपण केले. रात्री अभंग सेवा मंडळ (हेमंत ओक) यांचा सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम झाला.

# अॅड. रोशन पांढरे पुरस्काराने सन्मानित



**माणगाव : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील पन्हेली येथील विधिज्ञ अॅड.रोशन जनार्दन पांढरे यांना उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेना उपनेते व विधिमंडळ पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते विधी क्षेत्रातील पुरस्काराने आकर्षक सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन तालुका पत्रकार संघाच्या झालेल्या भव्य दिव्य अशा कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

अॅड. रोशन पांढरे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे. अॅड. रोशन पांढरे हे माणगाव येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात वकिली करीत असून विविध प्रकारचे प्रश्न, समस्यांवर काम घेऊन येणारे नागरिक यांचे म्हणणे एकूण घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून न्यायाधीशांसमोर पोटतिडकीने युक्तिवाद मांडून नागरिकांना न्याय मिळून देत असतात.

वेगवेगळ्या कंपन्यांचे कायदेशीर सल्लागार म्हणून ते काम पाहत आहेत. आपला वकिली व्यवसाय सांभाळून ते समाजात सामाजिक बांधिलकी राखून काम करीत असल्याने बहुजन समाजात त्यांनी आपली विशेष अशी ओळख निर्माण केली आहे.

# महिलांसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल इंडिया लिमिटेड, उसर यांच्यावतीने धसाडे, कुणे गावातील महिला व मुलींसाठी पाच दिवसीय मोफत स्वसंरक्षण स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.


गेल उसर पीडीएचपीपी प्रोजेक्ट मुख्य महाप्रबंधक अनुप गुप्ता व महाप्रबंधक जितिन सक्सेना, मुख्य प्रबंधक शितल लाकरा यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन शशिकला धसाडे पोलीस पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी, सामाजिक कार्यकर्त्या तथा ग्रामस्थ रंजना मधुकर धसाडे, दिपाली दिलीप धसाडे, पूजा राजेंद्र धसाडे- खउठझ कुणे बचत गट प्रमुख, जिया जयेश धसाडे-स्वराज्य ग्रामसंघ खजिनदार, लक्ष्मी दशरथ नाईक, रितिका महेंद्र धसाडे, प्रगती उमेश धसाडे, तुळसा बळीराम धसाडे, वनिता विश्वनाथ धसाडे, उर्मिला लक्ष्मण धसाडे, सुजाता जगन सुतार, सुप्रिया अजय धसाडे- स्वराज्य ग्रामसंघ लिपिक प्रशिक्षिका प्रणाली तळेगावकर, हर्षाली नागावकर, वेदिका लाडगे व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते गणेशाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शशिकला दिनेश धसाडे यांनी उपस्थित महिला व मुलींना शुभेच्छा देत स्वसंरक्षणाचे महत्त्व सांगितले व प्रिझम सामाजिक विकास संस्थेस शुभेच्छा दिल्या तर तपस्वी गोंधळी यांनी या पाच दिवसांच्या स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिरामध्ये कशाप्रकारे प्रशिक्षण दिले जाणार आहे.



# अलिबागेत श्री दत्त याग भव्य पूजा



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

श्रीमद गुरुपाद मूर्ती समाधीस्थळ व श्री दत्त मंदिर देवस्थान ट्रस्ट भुवनेश्वर मार्ग नारंगी तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथे झाली. या वेळी अलिबाग तालुक्यातील सारळ ते का मारले खिडकी संपूर्ण खारेपाट विभागातील ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते बावनपूजांसाठी ५२ जोडप्याने श्री दत्त याग सोहळ्याची भव्य पूजा झाली.

यामध्ये सामाजिक कार्यकर्त्या तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य भावना पाटील व पंचक्रोशीतील सरपंच उपसरपंच व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा मोठा सहभाग होता. हा कार्यक्रम उत्साहात झाला. यामध्ये पहिल्या दिवशी सामूहिक नामस्मरण महाप्रसाद दत्तजाग प्रारंभ २१ दांपत्य तसेच आयोजक जोशी परिवार नारंगी यजमान स्नेहल व सुभाष जोशी स्वामींची आरती हरिपाठ विविध कार्यक्रम झाले.

दुसऱ्या दिवशी होम हवन श्री दत्त याग पूर्णा होती व श्रीदत्त बावन्नी ५२ दांपत्य महापूजा संयोजक प्रेरणा प्रतिष्ठान वसई सतीश देव सुरेंद्र देव तसेच ह भ प नीलकर बुवा देहन पोयनाड यांनी कीर्तन सादर केला त्यानंतर गुरुप्रदक्षिणा महाआरती व महाप्रसाद तसेच सर्व मान्यवरांचा सन्मान त्यानंतर नारदीय कीर्तन तसेच टाकादेवी भजन मंडळ मांडवा यांनी कार्यक्रम सादर केले. येथील उल्लेखनीय कार्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रीमद गुरुपात मूर्ति समाधी स्थळ श्री दत्त मंदिर देवस्थान ट्रस्टचे सर्व पदाधिकाऱ्यांचे अनेकांनी कौतुक केले तर उपस्थित सर्व भाविकांचे आभार ट्रस्टच्या वतीने मांडण्यात आले.

गेल्या काही वर्षातच सदर ठिकाणी विविध कार्यक्रम संपन्न झाले सदर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संतोष वेळे विश्वस्त नरेश म्हात्रे खजिनदार संजय पाटील सचिव परशुराम आपण कर तसेच सर्व सदस्य व बहुसंख्येने भक्तजन महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिनीमातीचे मावळे बाजारपेठेत दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

बाजार पेठेत विविध प्रकारचे किल्ल्यांसाठी लागणारे साहित्य दाखल झाल्यामुळे शाळा सुटल्यावर त्यांचे पाय विक्रीस ठेवण्यास आलेले चिनीमातीचे मावळे खरेदी करण्यासाठी वळत आहे.

ग्रामीण भागत लहान मुले मोठ्या हौसेने किल्ला बनवीत असतात, परंतू या किल्ल्यांसाठी आवश्यक असते ती मावळ्यांची, यामुळे हे मावळे खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. वीस रुपये पासून ते पन्नास, शंभर रुपये पर्यंत हे मातीचे मावळे विक्रीस ठेवले असल्यामुळे यांची विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्यांचे पहावयांस मिळत आहे.

यामध्ये हत्ती, घोडे, तोफ, गवळण, शेतकरी, विविध प्रकारचे पक्षी, वाघ, सिंह, हत्ती हे सर्व विक्रीस ठेवल्याने प्रत्येक विद्यार्थी आवर्जुन खरेदी करीत असल्यामुळे यांची मागणी वाढली आहे.




**✻ जाहीरात ✻**

आनंदी को-ऑप. हौ. सोसायटी, टिळक रोड, पनवेल. आपल्या ५८९ स्क्वे. मी. च्या प्लॉटचा पुनर्विकास करू इच्छिते तरी इच्छूक विकासकानी पुढील १० दिवसात आपले इच्छापत्र अध्यक्ष श्री. कांबळे यांचेकडे सुपूर्त करावे ही विनंती. संपर्क क्र. ८०८२५४९२५६.

**दिनांक :- २६/१०/२०२४**

**सही/- सही/- सही/-**
**अध्यक्ष सचिव खजिनदार**

आनंदी सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित)

## निवडक

### ॲड. नेहा वाघ यांची नियुक्ती

**नवी मुंबई :** ॲड. नेहा वाघ यांची माटुंगा मुंबईतील सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटीच्या कमलाबेन गंभीरचंद शाह लॉ स्कूलमध्ये असलेल्या महाविद्यालय विकास समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. २०२४-२०२५ अशी एक वर्षासाठी ही नियुक्ती असणार असून १७ ऑक्टोबर २०२४ पासून ही पद नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. नेहा या उच्च न्यायालयात आपली प्रॅक्टिस करत आहेत. कायदेविषयक क्षेत्रात ॲड. नेहा वाघ यांचे भरीव कार्य आहे. त्यांच्या या कर्तुत्वाची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आली असल्याचे संस्थेने नियुक्ती पत्रात म्हटले आहे. कॉलेज डेव्हलपमेंट कमिटीचा सदस्य या नात्याने धोरणात्मक निर्णय, पायाभूत सुविधांच्या विकासासाठी, लॉ स्कूलच्या वाढीसाठी ॲड. वाघ यांची मदत होणार आहे.

### गांजासाठी घर घेतले भाड्याने

**नवी मुंबई :** एनआरआय पोलिसांनी सीवूड्स येथे घरावर छापा टाकून दीड लाख रुपयांचा गांजा जप्त केला आहे. हा तरुण मुंबईचा असून, सीवूड्समध्ये केवळ गांजाची साठवणूक करण्यासाठी घर भाड्याने घेतले होते. सीवूड सेक्ट ४८ ए मधील व्यंकटेश इमारतीमध्ये एका घरात गांजाचा साठवून ठेवला असल्याची माहिती एनआरआय पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांच्या पथकाने पाळत ठेवून तरुणाच्या घराची झडती घेतली. त्याच्यावर एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### भीती दाखवून उकळले पैसे

**नवी मुंबई :** मनी लॉण्डरिंग प्रकरणात कारवाईची भीती दाखवून महिलेकडून सहा लाख रुपये उकळल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे. सी-वूड परिसरात राहणाऱ्या ४४ वर्षीय महिलेसोबत हा प्रकार घडला. अज्ञात व्यक्तीने त्यांना फोन करून त्यांचा मनी लॉण्डरिंग गुन्ह्यात सहभाग असल्याचे सांगून कारवाईची भीती दाखवली. नंतर अटके टाळण्यासाठी ऑनलाईन बँक खात्याच्या तपासणीसाठी पैसे वेगळ्या खात्यावर पाठवण्यास सांगून सहा लाख रुपये उकळले. याप्रकरणी एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### नवी मुंबईत मतदान सेल्फी पॉईंट

**नवी मुंबई :** सध्याच्या सोशल मिडीयाप्रेमी युगात सेल्फी छायाचित्रांचे आकर्षण लक्षात घेऊन नवी मुंबई महापालिकेने ठिकठिकाणी आकर्षक सेल्फी पॉईंट उभारले आहेत. नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील सेल्फी पॉईंटवर आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी सेल्फी छायाचित्र काढून आपण मतदान करणार आहोत, असे अधोरेखित करीत २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूकीत सर्वांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन केले.

# नवी मुंबईत दिवाळी खरेदीमुळे बाजारपेठेत वाहतूक कोंडी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

दिवाळी सण काही दिवसांवर आला असल्याने, लोक मोठ्या प्रमाणात खरेदी साठी बाहेर पडत आहेत. त्यातच दिवसभर ऑक्टोबर हीटचा त्रास जाणवत असल्याने, नागरिकांना दिवसाबाहेर पडणे शक्य होत नाही. त्यामुळे संध्याकाळी मोठ्या प्रमाणात लोक बाहेर पडत आहेत. त्यामुळे सध्या दररोज संध्याकाळी रात्री शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा भार पडत आहे.



संध्याकाळी कार्यालय सुटण्याच्या वेळा आणि लोकांच्या खरेदी साठी बाहेर पडण्याच्या वेळा एकत्रच येत असल्याने रस्त्यांवर वाहणेच वाहने दिसत आहेत. खरेदीसाठी नवी मुंबईत नागरिकांना वाशी हे मुख्य ठिकाण आहे कारण वाशीतच, मोठं मोठे मॉल्स, कपडे, सोने चांदीची दुकाने, घरगुती शोभेच्या वस्तूंची दुकाने मोठ्या प्रमाणात आहेत. त्यातही एपीएमसी सारखी मोठी बाजारपेठ ही आहे. त्यामुळे शहराच्या सर्व भागातून संध्याकाळी वाशीकडे जाणारी वाहने, आणि येणारी वाहने मोठ्या प्रमाणात रस्त्यावर येत आहेत.

त्यामुळे पाम बीच मार्ग, इकडे ठाणे बेलापूर मार्ग, शिवाय रेल्वे स्थानकातून बाहेर पडणारे मार्ग या मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यात वाहन चालकांचा वेळ आणि इंधन ही वाया जात आहे, अशी प्रतिक्रिया किशोर पाटील यांनी दिली आहे.

एपीएमसी परिसरात तर दिवसभर वाहतूक कोंडी असल्याचे पाहायला मिळत आहे. फळ मार्केट कडून अन्नधान्य बाजाराकडे जाणारा मार्ग, तिथून पुढे अन्नपूर्णा चौकाकडे जाणारा मार्ग, माथाडी चौकातून चार ही दिशांना जाणाऱ्या मार्गांवर अन्न धान्याच्या गाड्या शिवाय खरेदी दारांच्या गाड्या यामुळे, वाहतूक कोंडी होत आहे. एकदा सिग्नल वर थांबलेली गाडी तीन सिग्नल थांबल्या शिवाय पुढे जाताच नाही अशी परिस्थिती सध्या या परिसरात आहे.

# पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा

## ■ नवी मुंबई महापालिकेचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्रातील फटाके विक्री करणारे सर्व व्यावसायिक व फटाक्यांचा वापर करणाऱ्या नागरिकांनी जास्त आवाज करणारे, प्रदुषण करणारे फटाके उडवू नये असे आवाहन पालिकेने केले आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री करणे बेकायदेशीर असून त्याबाबत दक्षता बाळगावी असे आवाहन पालिकेने केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार बेरियम सॉल्ट, लिथीयम, अर्सेनिक, लीड, मर्क्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विषारी वायू तयार होतात, हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच फटाक्यांमधून निघणाऱ्या विषारी घटकांपासून उद्भवणाऱ्या वायू प्रदूषणामुळे सरासरी २१२ इतकी वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

वाढत्या वायूप्रदूषणामुळे नागरिकांना श्वसनासंबंधीच्या समस्यांना सामोरे जावे लागते. जनहित याचिका क्र. १५२/२०१५ मध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करावयाची नाही, तसेच परवानगी असलेल्या फटाक्यांची महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच विक्री करावयाची आहे.

राष्ट्रीय हरीत लवाद मुख्य खंडपीठ, नवी दिल्ली यांचे ३ नोव्हेंबर २०२३ रोजी सुनावणी देताना आदेश दिले आहेत तसेच उच्च न्यायालय, मुंबई यांनी देखील स्वतःहून जनहित याचिका दखल करुन घेतलेली आहे. त्यानुसार नागरिकांनी केवळ संध्याकाळी ७ ते रात्री १० या कालावधीतच फटाके वाजवायचे आहेत.

आदेशातील कलम ७ (क) नुसार सर्व शैक्षणिक संस्था यांनी याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. याबाबत पोलीस प्रशासनाने दक्षतेने अंमलबजावणी करावयाची आहे. महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय सहाय्यक आयुक्त यांनी देखील पडताळणी करुन दक्षता घ्यावयाची आहे. नियम मोडल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

महाराष्ट्र शासनाचे 'माझी वसुंधरा अभियान ५.०', 'स्वचछ सर्वेक्षण २०२४' आणि 'स्वच्छ वायू सर्वेक्षण' अभियानांतर्गत' फटाकेमुक्त, प्लास्टिकमुक्त, कचरामुक्त, प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक (ग्रीन फेस्टिवल) सण-उत्सव साजरे करावयाचे आहेत. त्यानुसार नागरिकांनी मातीचे दिवे/पणत्या उजळवाव्यात, प्लास्टिकचा वापर टाळून कागदी किंवा कापडी आकाश कंदील लावावेत, फटाक्यांचा वापर टाळावा, प्लास्टिक ऐवजी कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा, झाडांवर विदयुत रोषणाई करु नये, सण - समारंभामध्ये टाकाऊ वस्तूंचा व पुनर्वापर करण्यायोग्य वस्तूंचा वापर करावा आणि पर्यावरणपूरक, प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

येणारी दिवाळी हरित व पर्यावरणपूरक साजरी करुया असे आवाहन करीत नमुंमपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे यांनी दिवाळीचा हा सण आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्व नागरिकांना दिवाळी सणानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत.

# पनवेलमध्ये गीतांचा कार्यक्रम



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलकर रसिकांसाठी वर्षभर संगीत-नाट्य-नृत्य-साहित्य आणि कलाविषयक कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन करणाऱ्या पनवेल कल्चरल असोसिएशनने अलीकडेच कोजागरी पौर्णिमेनिमित्त स्वरगंधर्व बाबूजी अर्थात सुधीर फडके यांनी संगीतबद्ध केलेल्या गीतांचा 'आज चांदणे उन्हात हसले..' हा सामगंध' निर्मित बहारदार कार्यक्रम संस्थेच्या सभागृहात आयोजित केला होता.

यात श्रावणी भिडे, अंशुल बोपर्डीकर, स्वरदा भट, मानसी जगताप, वृषांक पाटणकर, प्राजक्ता वझे, मनाली कुलकर्णी, श्रेयस केळकर, स्नेहल पाटील आणि अनिरुद्ध भिडे यांनी प्रथम तुज पाहता.., आज कुणीतरी यावे.., का रे दुरावा.., कुठे शोधिशी रामेश्वर.., स्वर आले दुरुनी.., घननिळा लडिवाळा.., जे वेड मजला लागले.., धुंदी कळ्यांना.., स्वप्नात रंगले मी.. इत्यादी लोकप्रिय गीते सादर केली.

कार्यक्रमात हार्मोनियम साथ केली अनिरुद्ध भिडे व अंशुल बोपर्डीकर यांनी, तर तबलासाथ केली धवल कुटे यांनी केली. निवेदनाची बाजू अश्विनी भिडे यांनी सांभाळली.

# नेरूळमध्ये लागलेल्या आगीत दोन जण जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर २० द्वारका हॉटेल शेजारी असलेल्या चिन्मय सोसायटीत घरात अचानक आग लागली. या आगीत आई व मुलगा दोघेही भाजले असून घराचे नुकसान झाले आहे. जखमींना तेरणा रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्रीतीश कुमार सिंग (वय२८) व पुष्पा सिंग (वय ५२) अशी जखमीची नावे आहेत.

या घरातील बेडरूममध्ये गादीला अचानक आग लागली, मात्र ही आग कशामुळे लागली ते समजू शकले नाही. या वेळी सिंग कुटुंबीयांपैकी मुलगा व आई बेडरूममध्ये होते. आग विझविताना त्यांचे हात भाजले. यात घरातील वस्तूंचे नुकसान झाले आहे. अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, अचानक इमारतीतून धूर यायला लागला. रहिवाशांनी धाव घेतली. ही माहिती मिळताच पोलीस व अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले.

अग्निशमन दलाने येत तातडीने अग विझविली, मात्र तोपर्यंत घराचे काही प्रमाणात नुकसान झाले होते. कशामुळे आग लागली याचा शोध अग्निशमन दल घेत आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात दिया डेकोरेशन व पेंटिंग स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२६) रसायनशात्र विभागाने दिया डेकोरेशन स्पर्धचे आयोजन केले होते.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन वेगवेगळे दिवे वापरून सजावट केली या स्पर्धेच्या माध्यमातून सादरीकरण केले. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. नमिता आखूरे यांनी काम पाहिले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या व रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले व सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. या स्पर्धेसाठी प्रा. डॉ. नीलम लोहकरे व प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. रूपाली नागरेकर व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# मुलीवर बलात्कार; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पंधरा वर्षीय मुलीसोबत शारीरिक संबंध ठेवून ती गर्भवती राहिल्या प्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पंधरा वर्षीय मुलगी पनवेल तालुक्यातील राहणारी असून मार्च २०२२ मध्ये आरोपी करण याने तिच्याशी ओळख केली आणि जंगलात भेटायला बोलावून जबरदस्तीने व मारण्याची धमकी देऊन तिच्यावर बलात्कार केला. तसेच मे आणि जून २०२४ दरम्यान आरोपी दिवेश कातकरी याने या मुली सोबत लग्न करण्याची हमी देऊन ती अल्पवयीन असल्याचे माहित असतानादेखील जंगलात नेऊन तिच्यावर बलात्कार केला. पीडित मुलगी गर्भवती राहिल्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी पोलिसांनी दिवेश कातकरी याला अटक केली. दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे.



**पनवेल :** भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल विधानसभेच्या वतीने शनिवारी शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या मैदानात विजय निर्धार युवा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रभाग १९ मधील बूथ क्र ४८९मधील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिवाळीसाठी सप्तरंगी रांगोळी बाजारात उपलब्ध





**पनवेल : वार्ताहर**

दिवाळी म्हटल्यावर सगळीकडे रोषणाई आणि रंगीबेरंगी रंग आलेच. दिवाळी आली की, बाजारात आकर्षित करणारी रांगोळी दिसू लागते. रांगोळी म्हटल्यावर डोळ्यांसमोर आपोआपच एक रंगीत आकृती समोर येते. औरस-चौरस तर कधी टिपक्यांची रांगोळी दारासमोर अतिशय आकर्षक दिसते. त्यामुळे सप्तरंगाच्या रांगोळ्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

दिवाळी सणाला प्रत्येकाच्या दारात रांगोळी काढली जाते. आधी सडा शिंपण करून रांगोळी काढली जायच, मात्र काळानुरुप आधुनिकीकरण वाढल्याने सिमेंटीकरण झाले. त्यामुळे अशा रांगोळी काढण्याची पध्दतदेखील बदलत गेली.

### स्टिकर रांगोळीची क्रेझ कायम

स्टिकरची रांगोळी, रेडिमेट प्रिंटेड रांगोळी असून हव्या त्या जागी फक्त चिकटवायची असते. या स्टिकरमुळे वेळ वाचतो. तसेच रांगोळी मोडण्याची, खराब होण्याची शक्यता नसते. सध्या बाजारात लक्ष्मीच्या पावलांचे स्टिकर्स, तोरण रांगोळीचे स्टिकर्स तर अगदी छोटे रांगोळीचे स्टिकर्स १० रुपयांपासून उपलब्ध आहेत. तर मोठ्या रांगोळीचे स्टिकर्स ३०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. यातही आता स्टोन लावलेले, थ्री डी मधील रांगोळीला पसंती मिळत आहे.

महाराष्ट्रात ठिपके काढून जोडण्याची प्रथा होती, पण आता रांगोळी काढण्यासाठी रेडिमेड सामान उपलब्ध झाले आहे. रांगोळी काढण्यासाठी आवश्यक असणारे छाप, रांगोळी पेन, पाऊलखुणा आणि कागदी छाप बाजारात उपलब्ध झाले आहे. ३० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत असे छाप मिळत आहे. या छाप्याने रांगोळी काढण्यासाठी लागणारी मेहनत कमी केली आहे. बाजारपेठेमध्ये आता रंगीत रांगोळी उपलब्ध झाल्याने रांगोळीचे रंग तयार करण्याचा त्रास कमी झाला आहे. त्यामुळे महिला वर्गांचा रंगीबेरंगी रांगोळी खरेदी करण्याकडे कल वाढत आहे. पांढरी रांगोळी बाजारात वर्षभर उपलब्ध असते.

यामध्ये आपल्या आवडीनुसार वेगवेगळे रंग मिसळून रंगीत रांगोळी तयार केली जाते आणि रांगोळीच्या डिझाईनमध्ये रंग भरले जातात; परंतु आता बाजारपेठेत तयार रंगीत रांगोळी आली आहे. निळा, हिरवा, लाल, भगवा, गुलाबी अशा रांगोळीच्या असंख्य छटा ५० ते ६० रुपये प्रतिकिलो दराने बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. त्याबरोबरच विविध प्रकारचे तयार छाप बाजारात विक्रीस उपलब्ध आहेत. छोट्या-छोट्या चौकोनी आणि गोलाकार छापांपासून अगदी २ फुटापर्यंतचे छाप विक्रीसाठी आले आहेत.

### आकर्षक रंगावलीच्या पुस्तकांनाही मागणी

सध्या बाजारात रांगोळीच्या पुस्तकांनादेखील मागणी वाढली आहे. याशिवाय कागदी ठिपल्याची कागद देखील बाजारात विक्रीसाठी आली आहेत. रांगोळी या पुस्तकांमध्ये ५ ठिपक्यांपासून ते ३० ते ४० ठिपक्यांच्या डिझाईन पहायला मिळतात. याशिवाय संस्कार भारतीच्या रांगोळीच्या आकर्षक डिझाईन्स देखील सोप्या पध्दतीने असल्याने त्या अनेकांना सहज काढता येतात



# शिरढोणमध्ये 'लाडक्या बहिणीं'कडून आमदार महेश बालदींच्या विजयाचा निर्धार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरणचे दमदार आमदार महेश बालदी यांच्या विधानसभा निवडणूक प्रचारार्थ शिरढोण गावातील महिलांची प्रचारसभा झाली. या प्रचारसभेत सर्व महिलांचा लाडका भाऊ आमदार महेश बालदी यांना भरघोस मतांनी निवडून देण्याचा निर्धार शिरढोण गावातील सर्व महिला भगिनींना केला.

या सभेत महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री मोफत तीन गॅस सिलेंडर योजना, मुलींना पदवीधर पर्यंत मोफत शिक्षण योजना, जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना, प्रत्येकासाठी पाच लाखांची आरोग्य विमा योजना, एसटी बस अर्धा तिकीट योजना अश्या महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी असणाऱ्या अनेक कल्याणकारी योजनांची माहीती देण्यात आली.

या प्रचारसभेत उरण महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, माजी पं.स. सदस्य तनुजा टेंबे, वंदे मातरम कामगार सेनेच्या समीरा चव्हाण, शिरढोण पाडा गाव महिला अध्यक्ष रेश्मा वाजेवर, शिरढोण गाव अध्यक्ष रेश्मा भोपी, प्रगती मुकादम, निकिता चौधरी, ग्रामपंचायत सदस्य पूनम मुकादम, भाजप केळवणे विभाग अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, प्रितेश मुकादम, ग्रामपंचायत सदस्य विजय भोपी, प्रमोद कर्णेकर, गजानन घरत, राम वाजेकर, मदन खारके, अनिल टकले, कैलास वाजेकर, दत्ता मुकादम, दीपक ठोकळ, संतोष भोपी, हर्षल भोपी आदी भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

# विजयाचा गुलाल महायुतीचाच असणार

## आमदार महेंद्र थोरवे यांचा दावा



**खोपोली : प्रतिनिधी**

होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत विजयाचा गुलाल हा महायुतीचा असणार आहे. या विजयाचे शिल्पकार भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते सुद्धा असणार आहेत, असा विश्वास आमदार महेंद्र थोरवे यांनी खोपोली येथे व्यक्त केला

खोपोली व खालापूर तालुका भाजप पदाधिकाऱ्यांचा संवाद मेळावा लोहाणा समाज हॉल येथे शनिवारी (दि. २६) दुपारी आयोजित करण्यात आला होता. या बैठकीला प्रमुख उपस्थिती आमदार महेंद्र थोरवे यांची होती. त्या वेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर भाजपकडून गोव्याचे कोकण निरीक्षक संकल्प अमोणकर, रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, महिला मोर्चा जिल्हा अध्यक्ष अश्विनी पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सभापती नरेश पाटील, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, सनी यादव, महिला मोर्चा शहराध्यक्ष अश्विनी अत्रे, युवा मोर्चा कर्जत खालापूर समन्वयक प्रसाद पाटील, शहर अध्यक्ष डॉ. निकेत पाटील, सरचिटणीस राहुल जाधव, अजय इंगुलकर त्याचप्रमाणे विविध सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी दीपक बेहेरे यांनी कार्यकर्त्यांच्या भावनेचा कदर शिवसेना मित्रपक्षाने करावी, अपेक्षा व्यक्त केली. जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी, आगामी निवडणुकीत भाजप हा महायुतीचा धर्म पाळणार व महायुतीचा उमेदवार कर्जत खालापूर मतदारसंघात निवडून येणार यासाठी भाजपचे कार्यकर्ते रात्रंदिवस प्रामाणिकपणे काम करणार, असा विश्वास व्यक्त केला.

आमदार थोरवे यांनी सर्व कार्यकर्त्यांच्या भावना ऐकून घेतल्यानंतर पहिल्या अडीच वर्षाच्या टर्ममध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना आम्ही आमदार असतानासुद्धा आमचेही ऐकले जात नव्हते. त्यामुळे महायुतीतील मित्रपक्षांना आम्हाला न्याय देता आला नसल्याची खंत व्यक्त केली, परंतु आता महायुतीत हिंदुत्वाचे सरकार असल्याने आगामी काळातही महायुतीचे सरकार येणार आहे. मागील झालेल्या चुका पुढे होणार नाहीत याची ग्वाही देत असून शिवसेनेबरोबर मित्र पक्षांना योग्य तो सन्मान देण्यात येईल, असे आश्वासनही आमदार थोरवे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दिले.

या वेळी महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून पुन्हा महायुतीचे सरकार सत्तेवर आणण्याचा एकमुखी संकल्प केला आणि आजच्या संवाद बैठकीत शेवट गोड झाला. मंगळवारी नामनिर्देशन भरण्यात येणार असल्याने सर्व भाजपाच्या कार्यकर्त्यांनी कर्जतला यावे असे निमंत्रण आमदार महेंद्र थोरवे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिले

# नेरळ ग्रामपंचायत प्रशासकांनी घेतला आरोग्य, पाण्याचा आढावा

**माथेरान, कर्जत : प्रतिनिधी**

सदस्यांच्या राजीनाम्यानंतर विभागीय आयुक्तांनी नेरळ ग्रामपंचायत विसर्जित केली होती. या ग्रामपंचायतीवर नुकतीच प्रशासकाची नियुक्ती होऊन ग्रामपंचायतीचा कारभार सांभाळण्याची जबाबदारी प्रशासकावर आली आहे. अशात डेंग्यूने थैमान घातलेल्या नेरळमध्ये सध्या नागरिकांना स्वच्छता, आरोग्य सुविधा पुरवण्यावर प्रशासक सुजित धनगर यांनी भर दिला आहे. नेरळकरांना शुद्ध व पुरेसे पाणी मिळावे यासाठी प्रयत्न करत असल्याचेही धनगर यांनी सांगितले.

आर्थिक आणि लोकसंख्येच्या दृष्टीने नेरळ ग्रामपंचायतीचा रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक होता. लोकसंख्या वाढत राहिली, पण नेरळ ग्रामपंचायतीचे उत्पन्न काही केल्या वाढले नाही. आजही घरपट्टी आणि पाणीपट्टीवरच नेरळ ग्रामपंचायत अवलंबून आहे. दुसरीकडे सदस्य व सरपंच यांच्यात मतभेद वाढून सरसकट सर्व सदस्यांनी राजीनामा दिला होता. सदस्यांच्या राजीनाम्यानंतर कोकण विभागीय आयुक्तांनी नेरळ ग्रामपंचायत विसर्जित केली. यानंतर प्रशासनाने या ठिकाणी कारभार सांभाळण्यासाठी प्रशासकाची नेमणूक केली. जिल्हा परिषदेमध्ये लघु पाटबंधारे विभागाचे उपअभियंता असलेले सुजित धनगर यांना प्रशासक ही जबाबदारी देण्यात आली.

धनगर हे कर्जत तालुक्यात राहणारे असल्याने या मातीशी आणि या माणसांशी त्यांची नाळ जुळलेली आहे. त्यामुळे माझ्या कार्यकाळात जे होईल ते जनतेच्या हिताचे असले पाहिजे हा दृष्टिकोन ठेवून त्यांनी कामाला सुरुवात केली आहे. त्यांनी सकाळी ६ वाजताच नेरळ गाठत सकाळी स्वच्छता करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची भेट घेतली. नेरळ शहरात सध्या डेंग्यूसदृश्य परिस्थिती असल्याने स्वच्छतेत कुचराई नको, अशा सूचना त्यांनी कर्मचाऱ्यांना दिल्या तसेच सर्व प्रभाग सकाळी फिरून तेथील कर्मचारी हे आपले काम चोख पार पडत आहेत याची खात्री करून घेतली. यासह काही नागरिकांकडून तेथील समस्यादेखील जाणून घेतल्या.

सकाळी नेरळ शहरात पाणी सोडण्यास सुरुवात केली जाते. तेव्हा थेट बोर्ले येथील जलशुद्धीकरण प्रकल्पावर भेट देत प्रशासक धनगर यांनी तेथील अडचणीही जाणून घेत नेरळ शहराला शुद्ध व पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याची माहिती दिली. पाणी विभागाचे कर्मचारी, तालुक्यातील तज्ज्ञ अधिकारी या सगळ्यांची एक बैठक घेऊन यावर काय उपाययोजना करता येतील त्या करण्यात येणार असल्याचेही त्यांनी या वेळी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



# एसटी बस बंद पडून प्रवाशांचा खोळंबा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील ३५ हजार प्रवासी येथील आगारातील एसटी बससेवेवर निर्भर असून दळणवळणाचे उत्तम माध्यम म्हणून एसटी वाहतुकीकडे पाहिले जाते, परंतु अलीकडे या आगाराला ग्रहण लागले आहे. पेण विभाग नियंत्रक कार्यालयाकडून जुन्या व जीर्ण बसगाड्या पाठवल्या जात असल्याने या गाड्यामध्येच बंद पडण्याचे प्रकार वाढू लागले आहेत.



मुरूड-महाड ही एसटी बसगाडी बारशिव घाट उतरताच बंद पडली. त्यामुळे प्रवासी बसच्या बाहेर येऊन दुसऱ्या गाडीची वाट पाहत होते. ही गाडी गॅसवर चालणारी होती, पण या गाडीमध्ये अचानक बिघाड होऊन इंजिन खूप तापले. या गाडीच्या चालकाने याची दखल घेत तत्काळ गाडी थांबवली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

मुरूड आगाराला काही गॅसवर चालणाऱ्या गाड्या देण्यात आलेल्या आहेत, पण या गाड्यांचा वापर गेली अनेक वर्ष केला गेला असल्याने त्या वारंवार बंद पडतात. याचा नाहक त्रास प्रवासीवर्गाला सहन करावा लागत आहे. सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी या आगारातील जुन्या गाड्यांसंदर्भात मरूड आगाराला टाळे लावण्याचा इशारा दिला आहे.

दरम्यान, मुरूड आगरास नवीन गाड्या देण्यात याव्यात व वारंवार गाडी बंद पडण्याच्या घटनेला आळा घालावा, अशी प्रवाशांची मागणी आहे.

# 'पतसंस्था टिकून राहणे प्रत्येक सभासदाची जबाबदारी'

**मुरूड : प्रतिनिधी**

कोणत्याही पतसंस्थेला आपल्या सभासदांचे मोलाचे सहकार्य अपेक्षित असते. सभासदांनी चांगले योगदान दिले तरच पतसंस्था चालतात. पतसंस्था टिकून राहणे ही पतसंस्थेच्या प्रत्येक सभासदाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन सहकार प्रशिक्षण पुणेचे प्रा. एस.बी. वटाणे यांनी केले.

श्री काळभैरव नागरी सहकारी पतसंस्था मुरूडच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यक्रमात प्रा. वटाणे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन दीपक पालशेतकर होते, तर आदित्य यादव, उपाध्यक्ष स्नेहा पाटील, सुरेश कासेकर, मनोहर कासेकर, निवास रसाळ, दीपक मयेकर, सुप्रेश खोत, भालचंद्र घुमकर, सुभाष पाटील, शंकर खेडेकर, संजय नाईक, पंचाक्षरी नाईक, व्यवस्थापक रुपाली कारभारी व कर्मचारी उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त सत्यनारायणाच्या पूजेचेही आयोजन करण्यात आले होते.

या वेळी विद्यार्थी, संस्थेचे पदाधिकारी व भंडारी समाजातील गुणवंत, यशवंतनगर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत, पत्रकार उदय खोत आदींसह ४० जणांचा सत्कार करण्यात आला. पतसंस्थेच्या सदस्य उषा खोत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर आभार प्रतीक पेडणेकर यांनी मानले.

# चेकपोस्टवर पोलिसांकडून कसून तपासणी

**खालापूर : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने खोपोली शिळफाटा येथे वाहनांची नाकाबंदी (चेकपोस्ट) करण्यात येत आहे. निवडणूक काळात अमली पदार्थ, मोठी रक्कम, अवैध मद्य, शस्त्रे यांचा तालुक्यात पुरवठा होण्याची शक्यता गृहीत धरून संशयित वाहनांची २४ तास तपासणी केली जात आहे. यासाठी पोलिसांचे तीन कर्मचारी, महसूल विभागाचे दोन कर्मचारी, तर एक कॅमेरामन दिवस व रात्री तैनात करण्यात आले आहे.



विधानसभा निवडणूक मुक्त वातावरणात, निष्पक्ष, शांततापूर्ण आणि प्रलोभनमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी जिल्ह्याच्या रस्ते आणि सागरी सीमांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे तसेच अवैध मार्गाने होणाऱ्या दारू वाहतुकीवरदेखील करडी नजर ठेवण्याचा निर्णय झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. यासह निवडणुकीमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक कारवाईचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार कारवाई करण्यात येत आहे.

आचारसंहितेचे पालन करण्यासाठी विविध पथके नियुक्त केली गेली आहेत. अमली पदार्थ, मोठी रोकड, अवैध मद्य उत्पादन आणि वाहतूक, अग्निशस्त्रे यावर विशेष लक्ष आहे. बाहेरच्या जिल्ह्यातून तसेच तालुक्यातून येणाऱ्या दुचाकी, कार, टेम्पो बस यासह वाहनांची व्हिडीओ कॅमेऱ्यात शूट करीत बारकाईने गाड्यांची तपासणी केली जात आहे.

# टेम्पोला आग

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर बोरघाटात शिंग्रोबा मंदिराजवळ लायनर गरम झाल्याने एका टेम्पोला रात्री आग लागली.



घटनास्थळी खोपोली नगरपालिकेच्या फायर ब्रिगेड टीमसह सहा अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

टेम्पोमध्ये (एमएच ४६-बीयू २३६९) पाच कुरियर बॉक्स होते. त्यापैकी चार बॉक्स काढण्यात आले, तर एक बॉक्स अर्धवट जळलेल्या स्तिथीत असताना फायरब्रिगेडच्या पथकाने आगीवर नियंत्रण मिळवले.

# शेतीच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील भातशेतीचे परतीच्या पावसाने मोठे नुकसान केले आहे. त्यामुळे शेतीच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याची मागणी किसान क्रांती संघटना यांनी केली आहे. याबाबत संघटनेने प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

ऑक्टोबर महिना संपत आला तरी परतीचा पाऊस वेगवेगळ्या भागात हजेरी लावत आहे. त्यामुळे भातशेती पावसाच्या पाण्यात भिजून मोठे नुकसान होत आहे. कर्जत तालुक्यातील भातशेतीचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांना भरपाई मिळावी या मागणीसाठी किसान क्रांती संघटनेने तहसीलदार आणि प्रांत अधिकारी तसेच कृषी अधिकारी यांना निवेदन दिले आहे.



परतीच्या पावसामुळे उभे असलेले भातपीक शेतात कापण्याआधीच जमिनीवर पडले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्यात शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना या आधीच तालुका कृषी अधिकारी यांना दिलेल्या आहेत. तालुकास्तरावर भातशेतीचा नुकसानीचे पंचनामे कृषी विभाग, महसूल विभाग आणि पंचायत समितीकडून सुरू आहेत, अशी माहिती किसान क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी दिली.किसान क्रांती संघटनेकडून कर्जत उपविभागीय अधिकारी तसेच कृषी अधिकारी यांच्या कार्यालयात जावून भाताच्या नुकसानाची भरपाई देण्यासाठी सरसकट पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी केली आहे.

किसान क्रांती संघटनेचे संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष उत्तम शेळके, अध्यक्ष भरत राणे, रामदास माळी, सुरेश खानविलकर, प्रकाश कांबेरे, मोरेश्वर भगत, सुरेश जाधव, विनायक देशमुख, अरुण शेळके, सदस्य रवींद्र गावंड यांच्यासह शेतकरी रोहिदास बडेकर, मंगेश बडेकर, तानाजी राणे, नारायण राणे, दत्तात्रेय देशमुख, काशिनाथ पादिर आदी उपस्थित होते.

# आमदार दळवींना मोठे मताधिक्य देणार -जीविता मिणमिने

**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग मुरूड मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्र दळवी यांना राजपुरी जिल्हा परिषद मतदारसंघातून मोठे मताधिक्य मिळणार असून याबाबतचा नुकताच दौरा झाला आहे. या भागातील लोक आमदार दळवी यांच्याच पाठीशी उभे राहणार असून राजपुरी जिल्हा परिषद मतदारसंघातून मोठे मताधिक्य देणार असल्याचे प्रतिपादन शिवसेनेच्या महिला संपर्कप्रमुख जीविता मिणमिने यांनी केले. त्या पत्रकारांशी संवाद साधत होत्या.

या वेळी जिल्हा संघटक दिनेश मिणमिने, सरोज मिणमिने, गणेश मिणमिने, विनोद मिणमिने, पंकज मोरे, मयूर मोरे, संदीप कमाने, गणेश मोकल, संदीप मोकल, केशव पाटील, मोहित कमाने आदी उपस्थित होते.



जीविता मिणमिने यांनी सांगितले की, आमदार दळवी यांच्यामुळे गोयगान गवळ वाडी येथे हनुमान मंदिर तसेच आंबोली बौद्ध समाज येथे स्मशानभूमीला संरक्षक भिंत तसेच तेथे २० लाख रुपयांचा अंतर्गत काँक्रीट रस्ता, शिवाजी स्मारक आंबोली येथे १५ लाख रुपये देण्यात आले होते. त्याचप्रमाणे खारआंबोली ग्रामपंचायतीमध्ये अनेक विकासकामे प्रगतिपथावर असून येथील ग्रामस्थ आमदार महेंद्र दळवी यांच्या विकासकामांवर खुश असून विधानसभा निवडणुकीत मोठे मताधिक्य देणार आहोत.

अलिबाग-मुरूड तालुक्यातील रस्ते सक्षम बनवून आमदार महेंद्र दळवी यांनी दिलेला शब्द पाळला आहे. पाणीपुरवठा, वीजप्रणाली आणि शैक्षणिक तसेच आरोग्यसेवा या सर्व पायाभूत सुविधा अत्यंत सक्षमपणे सुधारणा करून लोकांच्या मूलभूत प्रश्नाकडे विशेष लक्ष दिले आहे. आमदार दळवी हे नेहमी आपल्या मतदारांशी संवाद साधत असतात. त्यांच्या समस्या ऐकून घेतात, आणि तत्काळ उपाययोजना करतात. त्यामुळे जनतेशी त्यांची आत्मियता वाढली आहे. लोकांचे ते आवडते झाले आहेत. आमदार दळवी यांना निवडून देणे ही काळाची गरज असून योग्य काम करणाऱ्या नेत्याची निवड लोक प्रामाणिकपणे बजावतील, असा विश्वाससुद्धा जीविता मिणमिने यांनी व्यक्त केला.

या विधानसभा निवडणुकीत राज्य शासनाकडून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, एसटीमध्ये महिलांना ५० टक्के सूट, ज्येष्ठ नागरिकांना तीर्थदर्शन योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाल्याने विधानसभा निवडणुकीत सर्वच ठिकाणी शिवसेना, भाजप व राष्ट्रवादी पक्षाचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा दावा त्यांनी केला.

कोविड महामारी आणि पूरपरिस्थितीत त्यांनी आपल्या मतदारसंघातील नागरिकांच्या मदतीसाठी हजारो कुटुंबांना अन्न, पाणी, आणि वैद्यकीय सुविधा तातडीने उपलब्ध करून दिल्यामुळे ते जनतेच्या मनातील आवडते नेते बनले आहेत. सर्वसामान्य जनतेचे ऐकणारा, त्यांचे प्रश्न सोडवणारा, त्यांच्यासोबत राहणारा असा लोकप्रिय आमदार असल्याने ते या निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने निवडणून येतील, असा विश्वास शेवटी त्यांनी व्यक्त केला.

## माणगावमध्ये दीपसंध्या कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ व लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. अशोक साबळे यांच्या आठव्या स्मृतीदिनानिमित्त दीपसंध्या कार्यक्रमाचे आयोजन २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता साबळे विद्यालय या ठिकाणी करण्यात आले आहे.

स्मृतीदिनानिमित्त सकाळी १० वाजता आदरांजली, १०.३० वाजता सभा, सायंकाळी ७ वाजता पुरस्कार वितरण व दीपसंध्या असे विविध कार्यक्रम होणार आहेत. दीपसंध्या कार्यक्रमात ऑल दि बेस्ट (ऑर्केस्ट्रा) संदीप कर्नावट दिग्दर्शक व्हर्सटाईल सेलीब्रिटी सिंगर पूजा सोंडकर (निर्माती), मराठी अभिनेत्री स्वाती धोकटे, फिफा अवॉर्ड २०२२ (कतार) गायक के.के. (कमरुद्दीन), मी होणार सुपरस्टार फेम गायिका वर्षा एखंडे, आता होउदे धिंगाणा फेम गायक विनल देशमुख, आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त मिमिक्री कलाकार सीमा पोटे, सुधाकर पोटे हे कलाकार रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत.

# विद्यार्थ्यांच्या मदतीने मतदान जनजागृती

**चौक : प्रतिनिधी**

येणारी दिवाळी साजरी करताना शुभेच्छा माध्यमातून मतदान करा रे, हा संदेश वडगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदाराला दिला आहे.

दिवाळीच्या सणानिमित्त एक कंदील, एक दिवा मतदान कर रे भावा हे शुभेच्छा कार्ड वडगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी बनविले आहे. या शुभेच्छा कार्डची चर्चा तालुक्यात पसरली आहे. रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असते. या वर्षी स्विप कार्यक्रमांतर्गत दिवाळी सणानिमित्त शाळेत सण दिवाळीचा, उत्सव लोकशाहीचा व जागर मतदानाचा हा कार्यक्रम आयोजित करून गावात मतदान जनजागृती करण्यास सुरुवात करण्यात आली.

मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी स्विप पथक प्रमुख व खालापूर गटशिक्षण अधिकारी कैलास चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली चला करू मतदान मतदान या गीतावर नृत्य, नाट्य, पथनाट्य सादर करत वडगाव ग्रामपंचायत हद्दीतील गावातील घरोघरी संदेश दिला. या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे मुलांनी तयार केले मतदान जनजागृतीचा संदेश देणारे आकाशकंदील, रांगोळ्या व दिवाळी भेटकार्ड प्रत्येक मतदाराला देऊन जनजागृती केली. ही विद्यार्थ्यांची कृती खूपच प्रशंसनीय असून शासकीय अधिकारी यांनी कौतुक केले. उपक्रमासाठी पनवेल तालुक्यातील ज्योती भोपी, म्हात्रे गुरुजी, मनोज म्हात्रे व योगिनी वैदू यांनी या आईजी, या भाऊजी, मतदान कराजी ही लावणी गात वडगावच्या मतदारांना साद घातली. आमच्या मुलांनी दिवाळी मतदान जनजागृती साठी हे उद्देश ठेऊन केलेले उपक्रम खरोखर स्तुत्य आहे, असे माजी सरपंच महादेव गडगे यांनी सांगितले.



मुख्याध्यापक शाळेचे सुभाष राठोड व सर्व शिक्षक नेहमीच वेगवेगळे यशस्वी उपक्रम राबवत असतात. एक हजार शुभेच्छा कार्डाच्या माध्यमातून मतदान जनजागृती ही अभिनव संकल्पना सुंदर व कौतुकास्पद आहे, असे गटशिक्षण अधिकारी आणि स्वीप पथक प्रमुख कैलास चोरामले यांनी कौतुक करताना सांगितले.

मला नाविन्याची व नावीन्यतापूर्ण उपक्रम राबविण्याची आवड आहे. मुले व शिक्षक व पालकांचा पूर्ण सहभाग व पाठिंबा असतो. त्याचमुळे हे शक्य होते, असे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सांगितले.

# टीम इंडियाची घरच्या मैदानावर हार

## न्यूझीलंडने कसोटी मालिका जिंकत रचला इतिहास

**पुणे : प्रतिनिधी**

टॉम लॅथमच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंड संघाने मिचेल सँटनरच्या सर्वोत्तम खेळीच्या जोरावर पुण्याचे मैदान मारत इतिहास रचला. या सामन्यात भारतीय संघाला ११३ धावांनी पराभव पत्कारावा लागला आहे. टीम इंडियासमोर विजयासाठी ३५९ धावांचे लक्ष्य होते, ज्याचा पाठलाग करताना संघाला केवळ २४५ धावाच करता आल्या. तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० अशी आघाडी घेत किवी संघाने मालिका भारतीय मैदानात कसोटी मालिका जिंकण्याचे स्वप्न साकार केले आहे.

न्यूझीलंडच्या विजयाचा नायक डावखुरा फिरकीपटू मिचेल सँटनर ठरला. त्याने पहिल्या डावात सात आणि दुसऱ्या डावात सहा अशा एकूण १३ विकेट घेतल्या. दुसऱ्या डावात ३५९ धावांचा पाठलाग करताना भारताची सुरुवात दमदार झाली होती, पण कर्णधार रोहित शर्मा पुन्हा एकदा मिशेल सँटनरच्या गोलंदाजीत केवळ आठ धावा करून बाद झाला. गिल (२३) सावधपणे खेळत होता, मात्र लंचनंतर तो सँटनरच्या फिरकीत झेलबाद झाला.



यशस्वी जैस्वालने ४१ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले, जे न्यूझीलंडविरुद्ध भारतीय खेळाडूने केलेले सर्वात जलद अर्धशतक होते. जैस्वाल चांगल्या फॉर्ममध्ये असल्याचे दिसत होते, पण तोही ७७ धावांवर सँटनरच्या फिरकीत अडकला. यानंतर पंत (०) हा संघाची धावसंख्या १२७ असताना धावबाद झाला. विराट कोहलीकडून (१७) मोठ्या खेळीची अपेक्षा होती, पण तोही सँटनरच्या चेंडूवर एलबीडब्ल्यू आऊट झाला. यानंतर सँटनरची जादू पुन्हा एकदा दिसली. त्याने सर्फराझ खानला (९) क्लीन बोल्ड केले. भारताची सातवी विकेट वॉशिंग्टन सुंदरच्या (२१) रूपाने आली.

तो ग्लेन फिलिप्सच्या चेंडूवर विल यंगच्या हाती झेलबाद झाला. सुंदर बाद झाल्यावर भारतीय संघाची धावसंख्या १६७/७ झाली.

यानंतर जडेजा आणि अश्विनने भारताचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला, मात्र २०६ धावांवर अश्विन (१८) मिचेल सँटनरचा बळी ठरला. दुसऱ्या डावातील भारतीय संघाची ही आठवी आणि सॅन्टनरची सामन्यातील १३वी विकेट होती. त्यानंतर एजाज पटेलने आकाश दीपला बाद करून भारताला नववा धक्का दिला. त्यानंतर त्यानेच रवींद्र जडेजाला (४२) बाद करून भारताचा डाव गुंडाळला.

### भारताचा विजयरथ 'किवीं'नी रोखला!

मालिकेतील पहिला कसोटी सामना बंगळुरू येथे खेळला गेला होता. या सामन्यात भारतीय संघाचा आठ विकेटने पराभव झाला होता. किवी संघाने पुणे कसोटीही जिंकून भारताचा मायदेशात मालिका विजयाचा विजयरथ रोखला आहे. याआधी २०१२मध्ये टीम इंडियाने घरच्या मैदानात मालिका गमावली होती. त्यानंतर मायदेशी सलग १८ मालिका जिंकण्याचा विक्रम टीम इंडियाच्या नावे होता, पण न्यूझीलंडने सलग दोन्ही कसोटी सामने जिंकून मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे.

# रायगड जिल्ह्याचे ज्युनिअर खो-खो संघ जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ५०व्या कुमार गट (ज्युनिअर) मुले-मुली अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेसाठी रायगडाचे मुले व मुलींचा संघ जाहीर करण्यात आला आहे. २७ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत धाराशिव जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे खेळली जाणार आहे.

रायगड जिल्ह्याचे कुमार-मुली संघ निवडीकरिता जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा २० ऑक्टोबर रोजी पनवेल जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र यांच्या आयोजनाखाली आयोजित करण्यात आली होती. त्यातून रायगडचे संघ निवडण्यात आले.




मुलांचा संघ : जय घाडगे, गौरव टेंबे, भावेश गोविलकर (ना.म. जोशी विद्याभवन क्रीडा संघ, गोरेगाव), ध्रुव मोकल, दिपेंद्र पाटील, सुजल मोकल (महात्मा गांधी क्रीडा मंडळ, हाशिवरे), हिमेश म्हात्रे, साई थळे, पियुष पाटील (ओम साई, सानेगाव), सर्वेश गायकर, ओमकार सावंत, सिद्धार्थ पडवळ (तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र, पेण), मासूम मुजावर, विघ्नेश पाटील (वायुदूत क्रीडा केंद्र, पनवेल), प्रतीक जाधव (आशीर्वाद अ‍ॅग्रल, कामोठे), राखीव सुमित गजने (आशीर्वाद अ‍ॅग्रल, कामोठे), विकी जोशी (बंदरकाठा क्रीडा मंडळ, तळा), विवेक म्हात्रे (महात्मा गांधी क्रीडा मंडळ, हाशिवरे), प्रशिक्षक लावण्य मगर (पनवेल), व्यवस्थापक अक्षय मोरे (रोहा).

मुलींचा संघ : वैष्णवी थोरात, संजीवनी जगदाळे, श्रेया पोळ, प्रज्ञा गाडे (वायुदूत क्रीडा केंद्र, पनवेल) दिक्षा पाटील, साक्षी शेट्टी, लावण्या म्हात्रे, अनया अरसूल (जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, पनवेल), तृप्ती टेंबे, उपासना शिगवण, सायली टेंबे (ना.म. जोशी विद्याभवन क्रीडा संघ, गोरेगाव), ज्ञानेश्वरी कुपाडे, प्रतीक्षा तालीकोटे (ब्रुडर्स स्पोर्ट्स, कळंबोली), निधी गावंड (महात्मा गांधी क्रीडा मंडळ, हाशिवरे), सौम्या केणी (रूद्र क्रीडा संस्था, अलिबाग), राखीव निहारिका मुंढे (वायुदूत क्रीडा केंद्र, पनवेल), श्रीया भगत (जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, पनवेल), श्रावणी कचरे (वायुदूत क्रीडा केंद्र, पनवेल), प्रशिक्षक समीर म्हात्रे (पनवेल), व्यवस्थापक मीनाक्षी म्हसकर (पनवेल).

# यशस्वीने मोडला सेहवागचा विक्रम



**मुंबई : प्रतिनिधी**

न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या डावात टीम इंडियाचा युवा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालने तुफानी फलंदाजी केली. यशस्वीने एकट्याने किवी गोलंदाजांचा सामना करत अर्धशतक झळकावले. या अर्धशतकासह त्याने वीरेंद्र सेहवागचा मोठा विक्रम मोडला.

यशस्वीने अवघ्या ४१ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. यशस्वीचे हे कसोटी क्रिकेटमधील आठवे अर्धशतक होते. यासह त्याने सेहवागला मागे टाकले. यशस्वी जैस्वाल अर्धशतक पूर्ण केल्यानंतर झपाट्याने त्याच्या शतकाकडे वाटचाल करत होता, परंतु त्याला मिचेल सँटनरने बाद केले. त्याने ६५ चेंडूत ७७ धावा करून बाद झाला. या खेळीत त्याने नऊ चौकार आणि चार षटकार मारले.

यासह भारतीय भूमीवर कसोटी क्रिकेटमध्ये यशस्वीच्या नावावर एक मोठा विक्रमही नोंदवला गेला. त्याने वीरेंद्र सेहवागला मागे टाकले आहे. यशस्वीने भारतीय भूमीवर सर्वात जलद एक हजार धावा करण्याचा विक्रम केला आहे. हा आकडा गाठण्यासाठी २२ वर्षीय यशस्वीने केवळ १३२५ चेंडूंचा सामना केला, तर वीरेंद्र सेहवागने भारतीय भूमीवर १४३६ चेंडूंचा सामना करत आपल्या एक हजार धावा पूर्ण केल्या होत्या. अशा प्रकारे यशस्वी आता या बाबतीत पहिल्या स्थानावर पोहचला आहे. एवढेच नाही तर यशस्वी या वर्षी एक हजार धावा पूर्ण करणारा एकमेव भारतीय ठरला आहे. यंदाच्या कॅलेंडर वर्षात अशी कामगिरी करणारा यशस्वी जो रूटनंतर दुसरा फलंदाज आहे.

# वॉशिंग्टन सुंदरचा ११ विकेट्स घेत खास क्लबमध्ये प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर याने पुणे कसोटीत शानदार कामगिरी केली. सुंदरने न्यूझीलंडविरुद्धच्या या सामन्यात ११५ धावांत ११ बळी घेतले. त्याने पहिल्या डावात सात, तर दुसऱ्या डावात चार बळी घेतले. सुंदरच्या या कामगिरीचे कौतुक होत आहे. रविचंद्रन अश्विनसह २५ वर्षीय सुंदरने एका खास क्लबमध्ये प्रवेश केला आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात ११ किंवा त्याहून अधिक बळी घेणारा सुंदर हा चौथा भारतीय ठरला आहे. त्याच्याशिवाय ईएएस प्रसन्नाने किवी संघाविरुद्ध ११ विकेट घेतल्या आहेत. प्रसन्ना यांनी १९७६मध्ये ही कामगिरी केली होती. त्याचबरोबर अश्विनने एकदा १२ आणि एकदा १३ विकेट्स घेतल्या आहेत. अश्विनने २०१२ आणि २०१६मध्ये हा पराक्रम केला होता. एस वेंकटराघवनने १९६५मध्ये १२ विकेट घेतल्या होत्या.

# इमर्जिंग आशिया कपमधून भारत बाहेर

## सेमी फायनलमध्ये अफगाणिस्तानकडून दारुण पराभव

**ओमान : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानकडून २० धावांनी पराभूत झाल्याने भारतीय संघ इमर्जिंग आशिया कपमधून बाहेर पडला. उपांत्य फेरीच्या सामन्यात अफगाणिस्तानने पहिल्या डावात खेळताना २०६ धावांची मोठी मजल माली होती, मात्र प्रत्युत्तरात भारतीय संघ निर्धारित २० षटकांत केवळ १८६ धावाच करू शकला. रमणदीप सिंगने शेवटच्या षटकांमध्ये मोठे फटके मारत ६४ धावांची तुफानी खेळी खेळली, पण तो संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही.



या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो की त्यांच्यासाठी योग्य ठरला. झुबैद अकबरी आणि सेदिकुल्लाह अटल यांनी १३७ धावांची सलामीची भागीदारी केली. अकबरीने ६४ धावा, तर अटलने ८३ धावांची जलद खेळी करत टीम इंडियाला बॅकफूटवर ढकलले. उरलेले काम शेवटच्या ओव्हर्समध्ये आलेल्या करीम जन्नतने पूर्ण केले. त्याने २० चेंडूत ४१ धावांची तुफानी इनिंग खेळून अफगाणिस्तानची धावसंख्या २००च्या पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

२०७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या टीम इंडियाची सुरुवात खूपच खराब झाली. अभिषेक शर्मा अवघ्या सात धावा करून बाद झाला. प्रभसिमरन सिंग १९ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला. कर्णधार तिलक वर्माही स्वस्तात बाद झाला. अवघ्या ४८ धावांत तीन विकेट्स पडल्या होत्या. आयुष बदोनी आणि निहाल वढेरा यांनी काही वेळ डाव सांभाळला. बडोनीने ३१, तर वढेराने २० धावा केल्या, पण ते सामना जिंकवू शकले नाहीत.

एकवेळ परिस्थिती अशी होती की भारताला विजयासाठी शेवटच्या पाच षटकात ८५ धावा करायच्या होत्या. अशा परिस्थितीत रमणदीप सिंग आशेचा किरण बनून क्रीजवर उभा होता. रमणदीपने येथून चौकार आणि षटकार मारण्यास सुरुवात केली आणि २६ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. शेवटच्या षटकातील शेवटच्या चेंडूपर्यंत तो झुंजत राहिला, मात्र त्याची ३४ चेंडूत ६४ धावांची खेळी भारताला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरली.

# पाकिस्तानने इंग्लंडला हरवत कसोटी मालिका जिंकली

**रावळपिंडी : वृत्तसंस्था**

पाकिस्तानने मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटीत इंग्लंडला हरवून इतिहास घडवला. रावळपिंडीच्या क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात पाकिस्तानने इंग्लंडचा नऊ गडी राखून पराभव केला. त्याचबरोबर २०२१नंतर पाकिस्तानचा मायदेशातील पहिला कसोटी मालिका विजय ठरला आहे.

या सामन्यात साजिद आणि नोमान अली यांनी पाकिसान संघासाठी आश्चर्यकारक कामगिरी केली. विशेष म्हणजे या मालिकेतील पहिला सामना गमावल्याने पाकिस्तान संघावर मोठी टीका झाली होती. त्यानंतर दुसऱ्या आणि तिसऱ्या कसोटीसाठी संघात मोठा बदल केला. याबरोबरच सलग दोन सामन्यात इंग्लंडला लोळवत मालिका विजयावर २-१ने



शिक्कामोर्तब केले.

या सामन्यातील पहिल्या डावात साजिद खानने पाकिस्तानसाठी गोलंदाजी करताना सहा विकेट्स घेतल्या आणि ४८ धावांचे योगदान दिले. त्यानंतर दुसऱ्या डावात साजिदने चार विकेट्स घेतल्या. याशिवाय नोमान अलीने पहिल्या डावात तीन विकेट्स घेतल्या आणि फलंदाजी करताना ४५ धावा केल्या. त्यानंतर दुसऱ्या डावात नोमानने सहा विकेट घेतल्या.

पाकिस्तान क्रिकेट संघाने पहिला सामना गमावल्यानंतर जबरदस्त पुनरागमन केले. दुसऱ्या सामन्यानंतर तिसऱ्या सामन्यातही त्याने शानदार विजय नोंदवला आणि मालिका २-१ अशी जिंकली. इंग्लंडने पहिल्या डावात २६७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानने पहिल्या डावात ३४४ धावा केल्या. यानंतर पाकिस्ताने इंग्लंडचा दुसरा डाव अवघ्या ११२ धावांत गुंडाळला. त्यामुळे पाकिस्तानला दुसऱ्या डावात केवळ ३६ धावांचे लक्ष्य मिळाले, जे पाकिस्ताने ३.१ षटकांत एक गडी गमावून पूर्ण केले. म्हणजेच हा सामना जिंकण्यासाठी फक्त १९ चेंडू लागले.

छोट्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या पाकिस्तान संघाला १४ धावांवर पहिला धक्का बसला. सॅम अयुबला आठ धावांच्या वैयक्तिक धावसंख्येवर जॅक लीचने एलबीडब्ल्यू केले. यानंतर अब्दुल्ला शफीक आणि शान मसूद यांनी कोणताही धक्का बसू दिला नाही. शफिक पाच धावांवर नाबाद राहिला, तर कर्णधार शान मसूदने सहा चेंडूंत चार चौकार व एक षटकार लगावत २३ धावांची नाबाद खेळी खेळली. अशा प्रकारे शान मसूदने आपल्या नेतृत्वाखाली पाकिस्तान संघाला पहिला कसोटी सामना जिंकून दिला.

# आफ्रिकेविरुद्ध टी-२० मालिकेतून मयंक, शिवम, रायनला वगळले

## काही नव्या चेहऱ्यांना संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाला न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर तीन सामन्यांची कसोटी मालिका संपल्यानंतर लगेचच दक्षिण आफ्रिकेचा दौरा करायचा आहे. जिथे त्यांना चार सामन्यांची टी-२० मालिका खेळायची आहे. या दौऱ्यासाठी बीसीसीआयने टीम इंडियाची घोषणा केली आहे, ज्यामध्ये काही नवे चेहरे पहायला मिळाले आहेत.



या मालिकेत टीम इंडियाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे राहणार आहे. त्याचवेळी बीसीसीआयकडून मालिकेसाठी मयंक यादव आणि रायन पराग यांच्याशिवाय शिवम दुबेची संघात निवड करण्यात आलेली नाही.

बीसीसीआयने सांगितले की, मयंक यादव आणि शिवम दुबे हे दोन्ही खेळाडू दुखापतीने त्रस्त असल्याने निवडीसाठी उपलब्ध नाहीत. रियान पराग सध्या सेंटर ऑफ एक्सलन्ससमध्ये असून खांद्याच्या दुखापतीतून तो सावरत आहे.

बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेत टीम इंडियाचा भाग असलेला डावखुरा वेगवान गोलंदाज यश दयाल याची न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी संघात निवड झाली नाही. आता यशचा दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी संघात समावेश करण्यात आला आहे. याशिवाय अभिषेक शर्मा, संजू सॅमसन व जितेश शर्मा (यष्टीरक्षक), रिंकू सिंग, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, रमणदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, विजयकुमार वैशाख, अविनाश खान संघात आहेत.

# संघ म्हणून आम्ही कमी पडलो -रोहित शर्मा

**पुणे : प्रतिनिधी**

न्यूझीलंडविरुद्धच्या दारुण पराभवानंतर भारतीय कर्णधार रोहित शर्माने पराभवाची जबाबदारी स्वीकारली. एक संघ म्हणून आम्ही कमी पडलो असल्याचे रोहितने आवर्जुन सांगितले.

सलग दुसऱ्या पराभवामुळे टीम इंडियाने मालिका गमावली. पाहुण्या न्यूझीलंडच्या संघाला इतिहासात प्रथमत भारतात कसोटी मालिका जिंकण्यात यश आले. भारतीय फलंदाज सपशेल अपयशी ठरल्याने टीम इंडियावर ही नामुष्की ओढावली. विशेष बाब म्हणजे भारतीय संघ तब्बल ४,३३१ दिवसांनंतर आपल्या मायदेशात कसोटी मालिकेत विजय मिळवण्यात अपयशी ठरला.

आर अश्विन आणि रवींद्र जडेजा यांनी मागील १२ वर्षांत खूप चांगली कामगिरी केली. त्यामुळे एखाद्या सामन्यात त्यांच्याकडून काही खास न झाले तरी त्याचा स्वीकार करायला हवा. ते प्रत्येकवेळी फलंदाजीत चमक दाखवू शकत नाहीत. आम्ही कसोटी आणि मालिका हरलो याने मी दुखावलो आहे. पहिल्या डावात साजेशी फलंदाजी न केल्याने पराभवाचा सामना करावा लागला असे सांगताना आम्ही एक संघ म्हणून अपयशी ठरलो असून कोणता फलंदाज किंवा गोलंदाज दोषी नाही हा संघाचा पराभव आहे, असे भारतीय कर्णधार रोहित शर्माने सांगितले.

# 'डब्ल्यूटीसी'मध्ये भारताचे स्थान धोक्यात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यूझीलंड संघाने मोठा इतिहास घडवत पहिल्यांदाच भारतात कसोटी मालिका जिंकली. भारताला दारूण मालिका पराभवाला सामोरे जावे लागले आहे. याचा आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेवर परिणाम झाला आहे.

भारत सध्या १२ सामन्यांनंतर ६८.०६ टक्के गुणांसह जागतिक कसोटी चॅम्पियनशिप क्रमवारीत अव्वल स्थानी होता. ऑस्ट्रेलिया ६२.५० टक्क्यांसह दुसऱ्या स्थानावर, तर श्रीलंका ५५.५६ टक्क्यांसह तिसऱ्या स्थानावर आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेपूर्वी डब्ल्यूटीसी फायनलमध्ये पोहचण्यासाठी भारत मजबूत स्थितीत दिसत होता, मात्र बंगळुरूनंतर आता पुण्यातील निराशाजनक पराभवानंतर अंतिम फेरीचा मार्ग थोडा आव्हानात्मक बनला आहे. भारतीय संघाला या पराभवानंतर टक्केवारीत फटका बसला आहे. भारताची टक्केवारी आता ६२.८२वर घसरली आहे, जी ऑस्ट्रेलियाच्या टक्केवारीच्या फारच जवळ आहे. जर भारताने आपली कामगिरी सुधारली नाहीतर त्यांना गुणतालिकेतील पहिले स्थान गमवावे लागेल.

### गुणतालिकेतील टक्केवारीत पुन्हा झाली घसरण

भारताला आता पुढील सहा कसोटी सामन्यांपैकी चार सामने संघाला जिंकावे लागतील, तर एक सामना ड्रॉ करावा लागेल. पुणे कसोटीनंतर भारताला किवी संघाविरुद्ध एक कसोटी आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच कसोटी सामने खेळायचे आहेत. अंतिम फेरीत पोहचण्यासाठी भारताला न्यूझीलंडविरुद्धचा तिसरा कसोटी सामना जिंकावा लागेल आणि बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये ऑस्ट्रेलियाचा ३-२ असा पराभवही करावा लागेल. तसे झाले नाही तर भारताला अंतिम फेरी गाठणे कठीण होऊ शकते. भारतीय संघ जर पुढील सहापैकी चार सामने जिंकण्यात अपयशी ठरला तर इतर संघांच्या मालिकेतील अनुकूल निकालांवर अवलंबून राहावे लागेल.

# ...म्हणून ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी शमीला वगळले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बीसीसीआयने ऑस्ट्रेलियातील बॉर्डर-गावसकर ट्रॉफीसाठी आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी शुक्रवारी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. यापैकी बॉर्डर गावसकर ट्रॉफीसाठी भारतीय संघाच्या निवडीमध्ये अनेक आश्चर्यकारक गोष्टी पाहायला मिळाल्या आहेत. विशेष बाब म्हणजे मोहम्मद शमीची संघात निवड करण्यात आलेली नाही.



घोट्याच्या शस्त्रक्रियेतून सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या मोहम्मद शमीची अनुपस्थिती ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. त्याच्या पुनर्वसनाची प्रगती असूनही नुकत्याच त्याच्या गुडघ्याला आलेल्या सूजेमुळे त्याच्या उपलब्धतेवर शंका निर्माण झाली आहे.

२२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारताने आपल्या १८ सदस्यीय संघात अभिमन्यू ईश्वरन, वेगवान गोलंदाज हर्षित राणा आणि अष्टपैलू नितीश कुमार रेड्डी या तीन नवीन खेळाडूंचा समावेश केला आहे. बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार मुकेश कुमार, नवदीप सैनी आणि खलील अहमद यांना प्रवासी राखीव खेळाडू म्हणून संघात समाविष्ट केले आहे.

**अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीला संधी**

ऑस्ट्रेलियाविरूद्ध बॉर्डर गावसकर ट्रॉफीसाठी जाहीर झालेल्या भारतीय संघात युवा प्रतिभावान अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीला संधी मिळाली आहे. नितीश फलंदाजीसोबतच वेगवान गोलंदाजीही करतो. संघातील नव्या चेहऱ्यांमध्ये अभिमन्यू ईश्वरन, हर्षित राणा आणि नितीश रेड्डी यांच्या नावांचा समावेश आहे, तर इर्शात शर्मा, अजिंक्य रहाणे, चेतेश्वर पुजारा या वरिष्ठ खेळाडूंना संघात स्थान मिळू शकलेले नाही.

**कामासाठी मुलगा पाहिजे**
**अनुभव** :- MS-CIT, Tally कमीत कमी १ वर्षे अनुभव
**पत्ता** :- श्री.गणेश टेड्रर्स गाळा नं ४७-५० मार्केट यार्ड पनवेल
**मो.नं** :- ८६८९८९३७१५ ९०२९३३९९९९
**Salary: 15000 ते 18000**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com